




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा








रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ०५.०६.२०२५ | अंक नं. ५६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020













# नगरमधील लेंडकर मळ्यात बिबट्याच्या हल्ला; गायीचा मृत्यू

**पहाटेची घटना, परिसरात घबराट, पिंजरा लावण्याची नागरिकांची मागणी**



लेंडकर मळ्यात बिबट्याच्या हल्लयात मृत्यू झालेल्या गायीचे शवविच्छेदन करताना पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर काळे समवेत वनरक्षक विजय चेमटे, वन्यजीव अभ्यासक हर्षद कटारिया व शेतकरी अशोक चिपाडे.

नगर – नगर शहरातील बालिकाश्रम रस्त्यावरील लेंडकर मळ्यात बिबट्याने एका शेतकऱ्याच्या गोठ्यात बांधलेल्या गायीवर हल्ला करून तिचे लचके तोडले आहेत. या हल्लयात गायीचा मृत्यू मृत्यू झाला आहे. ५ जून रोजी पहाटेच्या सुमारास ही घटना घडली असून त्यामुळे परिसरात घबराट पसरली आहे. या भागात तातडीने पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, लेंडकर मळा या ठिकाणी शेतकरी अशोक चिपाडे यांचे शेत व जनावरांचा गोठा आहे. चिपाडे यांनी ४ जून रोजी रात्री जनावरांना चारा पाणी केले व ते घरी गेले. ५ जून रोजी सकाळी ते पुन्हा जनावरांना चारापाणी करण्यासाठी गोठ्यावर गेले असता गोठ्यात बांधलेली एक गाय त्यांना मृत अवस्थेत आढळून आली. कोणत्यातरी हिंस्र प्राण्याने त्या गायीवर हल्ला करून तिचे लचके तोडल्याचे निदर्शनास आल्यावर त्यांनी याबाबत वन विभागाला फोन करून माहिती दिली.

ही माहिती मिळताच वनरक्षक विजय चेमटे, वन्यजीव अभ्यासक हर्षद कटारिया यांनी तातडीने घटनास्थळी जावून पाहणी केली. त्या परिसरात त्यांना बिबट्याच्या पावलांचे ठसे आढळून आले नाहीत मात्र हा हल्ला बिबट्यानेच केला असल्याचा संशय वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला. त्यानुसार त्यांनी घटनास्थळी पंचनामा केला. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर काळे यांनी मृत गायीचे जागेवरच शवविच्छेदन केले आहे.

बिबट्याच्या हल्लयात गायीचा मृत्यू झाल्याची माहिती मिळताच घटनास्थळी नागरिकांनी गर्दी केली. तसेच लेंडकर मळा या ठिकाणी बिबट्या पकडण्यासाठी तातडीने पिंजरा लावण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी व शेतकऱ्यांनी केली आहे. तसेच शेतकरी अशोक चिपाडे यांची सुमारे ५० ते ६० हजार रुपये किंमतीची गाय दगावली असून त्यामुळे त्यांना तातडीने नुकसान भरपाई मिळावी अशी देखील मागणी यावेळी करण्यात आली.

# नगर-पुणे महामार्गावर अपघात; केडगावच्या तरुणाचा जागीच मृत्यू





सोफियान शेख

नगर – नगरहून सुपा एमआयडीसीत कामानिमित्त चाललेल्या तरुणाच्या मोटारसायकलला पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या आयशर टेम्पोने धडक दिल्याने रस्त्यावर पडून त्या तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना नगर – पुणे महामार्गावर सुप्याजवळील पवारवाडी घाटात असलेल्या ग्रीन हेवन मंगलकार्यालयासमोर ५ जून रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली. सोफियान अय्युब शेख (वय २४, रा.शाहूनगर, केडगाव) असे मयत तरुणाचे नाव आहे.

मयत सोफियान शेख हा सुपा एमआयडीसीत काम करत होता. त्यानिमित्तानेच तो ५ जून रोजी नेहमीप्रमाणे आपल्या हिरो कंपनीच्या स्प्लेंडर प्रो मोटारसायकलवर (क्र. एमएच १६ ए क्यु ७७०२) केडगावहून सुप्याकडे चालला होता. घाटात असलेल्या ग्रीन हेवन मंगल कार्यालयासमोर त्याच्या पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या आयशर टेम्पोने त्याला धडक दिल्याने तो पडला. त्याच्या डोक्याला गंभीर इजा होवून त्याचा जागीच मृत्यू झाला.

अपघातानंतर टेम्पो चालक पसार झाला मात्र काही नागरिकांनी तातडीने सुपा पोलिसांना माहिती दिल्याने पोलिसांनी तो टेम्पो अडवून चालकाला टेम्पोसह ताब्यात घेत पोलिस ठाण्यात आणले. या प्रकरणी सुपा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून मयताच्या नातेवाईकांच्या फिर्यादीनंतर अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. सोफियान शेख याच्या पश्चात पत्नी व १ मुलगी आहे.










जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# जीएसटी विवरणपत्रक : नवीन तरतुदीमुळे छोटे व्यापारी त्रस्त

जीएसटी रिटर्न–१ मध्ये टेबल १३ अनिवार्य केल्याने लहान व्यावसायिकांच्या अडचणी वाढण्याची शक्यता : टेबल १३ भरल्याशिवाय GST दाखल होणार नाही

GSTR–१ फॉर्म भरण्यासाठी सरकारने टेबल १३ फॉर्म भरणे अनिवार्य केले आहे. नवीन नियमामुळे लहान व्यावसायिकांच्या अडचणी वाढणार असल्याचे दिसून येते आहे.

GST कायदा अधिक पारदर्शक आणि डेटा–आधारित करण्यासाठी सरकारने अलीकडेच GSTR-१ फॉर्ममध्ये टेबल १३ अनिवार्य केले आहे. पूर्वी हा फॉर्म पर्यायी होता. यामध्ये, व्यापाऱ्यांना मे २०२५ च्या GSTR–१ पासून विक्री, नोंदणी नसलेल्यांकडून खरेदी, सुधारित बिल, डेबिट नोट, क्रेडिट नोट, पावती व्हाउचर, पेमेंट व्हाउचर, रिफंड व्हाउचर, जॉब वर्कसाठी डिलिव्हरी चलन इत्यादी माहिती भरणे बंधनकारक करण्यात आले आहे.

यापुढे, विवरणपत्रकातील टेबल क्रमांक १३ भरल्याशिवाय GSTR–१ दाखल होऊ शकणार नाही. यामध्ये, अनुक्रमांक देऊन, त्याचे संदर्भ या टेबलमध्ये विचारण्यात आले आहे.

तसेच, किती इनव्हॉइस, व्हाउचर इत्यादी जारी केले आहेत. किती इनव्हॉइस, व्हाउचर रद्द केले आहेत. एकूण किती इनव्हॉइस, व्हाउचर जारी केले आहेत.

या नवीन आदेशामुळे लहान व्यापाऱ्यांसाठी अनेक व्यावहारिक समस्या निर्माण झाल्या आहेत. यामुळे, नवीन आदेशाचे पालन करणे कठीण होईल. भविष्यात, व्यापाऱ्यांनी आदेशाचे पालन न केल्यास त्यांना समस्यांना तोंड द्यावे लागेल. माहे मे महिन्याचे पासून विवरणपत्रासाठी ही तरतूद नव्याने करण्यात आल्याचे दिसते.

### काय आहे GSTR–१ मधील टेबल १३?

टेबल १३ : HSN Summary of outward supplies (HSN-wise summary of outward supplies). यामध्ये करदात्याने त्यांच्या विक्रीच्या एकूनएक वस्तूंसाठी किंवा सेवांसाठी एचएसएन कोड, करयोग्य मूल्य, कर दरानुसार कराची रक्कम इत्यादी तपशील भरायचे असतात. पूर्वी काही मर्यादांपर्यंत HSN कोड भरायला सवलत होती. लहान व्यावसायिकांना याचा फारसा त्रास नव्हता. परंतु आता ही माहिती भरल्याशिवाय GSTR–१ फाईलच होणार नाही, शिवाय हे सिस्टीममध्ये अनिवार्य (mandatory) करण्यात आले आहे.

यामुळे छोटे किराणा, कटलरी, मेडिकल सारख्या किरकोळ व लहान व्यावसायिकांना अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

कारण, अनेक किरकोळ व्यापाऱ्यांना त्यांच्या वस्तूंचे अचूक HSN कोड माहिती नसतात. लहान व्यावसायिकांकडे बऱ्याचदा सॉफ्टवेअर आधारित बिलिंग सिस्टीम नसते, जे आपोआप HSN जनरेट करेल. कर सल्लागार किंवा त्यांचे अकौंटंटकडेही अनेकदा लहान व्यापारासाठी अचूक HSN माहिती नसते, त्यामुळे वेळ व पैसा खर्च होतो. अनेकांनी आजवर केवळ धंद्याची उलाढाल दर्शवून, जीएसटी रिटर्न भरले होते व तशी सवय केली होती. आता प्रत्येक वस्तूंचा HSN नोंदवावा लागणार आहे. यात भर म्हणून, चुकीचे HSN टाकल्यास पुन्हा जीएसटी विभागाकडून दंडात्मक कारवाईची शक्यता निर्माण झाली आहे.

शासनाला त्यांच्याकडील डेटा अचूक व सुसंगत ठेवण्याचा उद्देश असून, त्यांच्या सोयीसाठी विभागीय क्रॉस व्हेरिफिकेशन सुलभ करणे, खोटी बिले शोधून काढून, व्यापाऱ्यांच्या इनपुट टॅक्स क्रेडिट क्लेम्सची पडताळणी सुलभ करणे हा हेतू असला तरीपण जीएसटी विभागाकडून या बाबत व्यापाऱ्यांसाठी विवरण पत्रकात सुलभता आणणे आवश्यक आहे.


किमान लहान व्यावसायिकांना HSN कोड संदर्भासाठी गाइडलाइन उपलब्ध करून देऊन, व्यवसाय, व्यापारानुसार (sector-wise) सोपी यादी पुरवायला हवी, सॉफ्टवेअर कंपन्यांनी सुद्धा आपली बिलिंग सिस्टीम अपडेट करणे आवश्यक आहे. शासनानेसुद्धा मर्यादित उलाढाल (टर्नओव्हर) असणाऱ्यांना काही प्रमाणात सवलत देणे गरजेचे आहे.



एकूणच हा बदल तांत्रिकदृष्ट्या योग्य असला तरी प्रत्यक्ष व्यवहारात लहान व्यापाऱ्यांसाठी सुरवातीला त्रासदायक होणार हे निश्चित.

**– नितीन दत्तात्रय डोंगरे, अध्यक्ष, नॉर्थ महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन**

# प्रेरणादायी अक्षरधन...



## सातत्य, समर्पण व निष्ठेचे ‘विराट’ स्वप्न साकार

विराट कोहली – एक अत्यंत आदर्श प्रेरणादायी खेळाडू. जुनुन, प्रचंड मेहनत अन् आत्मविश्वासाचे अनोखे उदाहरण.

काल हरफनमौला सिद्धू त्याच्याबद्दल म्हणाला, ‘‘बाकी सब प्रजा है, विराट अकेला शेर राजा है’’.

अगदी खरंय. आम्हा भारतीयांचा क्रिकेट खेळ म्हणजे जीव की प्राण. त्यात विराटसारखा खेळाडू खेळतांना ६७ कोटी लोक सामना पाहात असतील तर त्यात नवल ते काय?

विराटने क्रिकेटच्या सर्व प्रकारच्या फॉरमॅटमध्ये कर्तबगारीची पताका फडकावली आहे. लिटिल मास्टरने वैयक्तिक यशाची मोठी यशोगाथा लिहिल्यानंतर मास्टर ब्लास्टर सचिनने विक्रमांचा षटकार ठोकला. पण वैयक्तिक विक्रमांसह संपूर्ण संघाला नेतृत्व देऊन यशाची सवय लावण्याची व अरेला कारे म्हणण्याचा मंत्र सौरव गांगुलीने लावली. त्यायाही पुढे येऊन विराटने नेतृत्वाचा पराक्रम केला. तसं तर द्रविड, लक्ष्मण यांच्यानंतर आता नवी पिढीही धुमधडाका करीत आहे

तरीपण सलग फिटनेससह पुढाकार घेऊन खेळणारा व ३६ व्या वर्षीही धावांची भूक असणारा विराट हा वेगळाच. सलग १८ वर्षे एकाच संघाशी निष्ठा ठेवून विजेतेपद मिळवण्यास तपस्या, साधना, निष्ठा ठेवावी लागते.

त्याच्या वैयक्तिक विक्रमांच्या आकडेवारीत न जाता त्याचे सातत्य, समर्पण व चिकाटी, आत्मविश्वास याचा प्रत्येकाने विचार करावा हे महत्त्वाचे. त्याचा आवेश, जोश, चैतन्य केवळ अनुसरावे असे.

खेळाडू असला तरी तोही मनुष्यच. शेवटच्या षटकातील त्याच्या चेहऱ्यावरचे हावभाव, स्वप्न साकारणार म्हणून डोळ्यात आलेले मौल्यवान अश्रू – हेच तर सार्थकतेचे क्षण असतात. यातच तर जीवन साफल्य दडलेले असते. अशाच अविस्मरणीय क्षणांवर संपूर्ण आयुष्य ओवाळून टाकायचे असते... विराट तूसी ग्रेट हो...

**माजी क्रिकेटपटू – किशोर गांधी**

# कृषी कर्मचाऱ्यांचे लेखणी ‘बंद’आंदोलन

## प्रलंबित मागण्यांसाठी लिपिक संवर्ग कृषी कर्मचाऱ्यांचे ’काम बंद’ आंदोलन



प्रलंबित मागण्यांसाठी कृषी कर्मचाऱ्यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी विभाग लिपिक वर्गीय संघटनेच्या अहिल्यानगर शाखेचे जिल्हाध्यक्ष आकाश बिल्ला, उपाध्यक्ष स्वप्नील खडामकर, सचिव दत्तात्रय महामुनी यांच्यासह युनुस बेग, विजयकुमार शिंदे, अमित डाके, स्वप्नील पाटोळे, गजानन अकोलकर, मयुरी कडे, जयश्री चव्हाण, सोनाली पवार व संघटनेचे सभासद सहभागी झाले आहेत. (छाया – समीर मन्यार)

नगर – लिपिक संवर्ग कृषी कर्मचारी संघटनेच्या विविध मागण्यांसाठी अहिल्यानगर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयासमोर कर्मचाऱ्यांनी धरणे आंदोलन केले. प्रलंबित मागण्यांची दखल न घेतल्याने २ जूनपासून लेखणी बंद आंदोलन सुरू करण्यात आले. मागण्यांची दखल न घेतल्यास ५ जून पासून काम बंद आंदोलन केले आहे.

संघटनेने सरकारकडे निवेदनाद्वारे अनेक मागण्या यापूर्वीच केल्या आहेत. सुधारित आकृतिबंधमध्ये लिपिक संवर्गीय अधिकारी कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध आयुक्तालय ते क्षेत्रिय कार्यालय स्तरावरील कोणतेही पद कमी न करता संघटनेने सुचवलेल्या किफायतशीर व आर्थिक बचतीच्या प्रस्तावास अंतिम मान्यता देण्यात यावी.

लिपिक संवर्गातील पदोनती स्तर कमी करण्यासाठी सुधारित आकृतिबंधामध्ये सहाय्यक अधीक्षक पद सुधारित मागणीनुसार कक्ष अधिकारी गट ब कनिष्ठ या पदांमध्ये समाविष्ट होण्याबाबत व पदनामात बदल करण्यात मान्यता द्यावी, लिपिक संवर्गीय अधिकाऱ्याचे सुधारित सेवा प्रवेश नियम तयार करावे, लिपिक संवर्गीय प्रति नियुक्तीची पदे चिन्हांकित होऊन त्यास मान्यता देण्यात यावी. वरिष्ठ लिपिक पदे १०० टक्के पदोन्नतीने भरण्याबाबत सेवा प्रवेश नियमांमध्ये बदल करण्यात यावा, सहाय्यक प्रशासन अधिकारी हे पद ७५ टक्के पदोन्नतीने व २५ टक्के सरळ सेवेने भरण्याबाबत सेवा प्रवेश नियमांमध्ये बदल करण्यात यावा,इत्यादी मागण्यासाठी धरणे आंदोलन व लेखणी बंद करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी विभाग लिपिक वर्गीय संघटनेच्या अहिल्यानगर शाखेचे जिल्हाध्यक्ष आकाश बिल्ला, उपाध्यक्ष स्वप्नील खडामकर, सचिव दत्तात्रय महामुनी, युनुस बेग, विजयकुमार शिंदे, अमित डाके, स्वप्नील पाटोळे, गजानन अकोलकर, मयुरी कडे, जयश्री चव्हाण, सोनाली पवार, संघटनेचे सभासद सहभागी झाले आहेत.

# अतिवृष्टीग्रस्त गावांतील कामांसाठी आपत्ती व्यवस्थापनातून निधी द्या

## खासदार निलेश लंकेंची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी, आवश्यक कामांची यादीही दिली

नगर – नगर तालुक्यातील विविध गावांमध्ये उद्भवलेल्या पूर परिस्थितीमुळे पायाभूत सुविधांची हानी झाली असून त्याची दुरूस्ती व सुशोभीकरणासाठी आपत्ती व्यवस्थापनातून निधी मंजूर करण्याची मागणी खासदार निलेश लंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. यासोबत कोणत्या गावात कोणते काम तातडीने करणे आवश्यक आहे याची यादीही त्यांनी दिली आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, नगर तालुक्यातील गावांमध्ये झालेली अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे पूरस्थिती निर्माण होउन सार्वजनिक मालमत्तेस मोठ्या प्रमाणात नुकसान पोहोचले आहे. या आपत्तीमध्ये रस्ते, पुल, स्मशानभुमी, बंधारे, घाट, वस्ती जोड रस्ते इ. पायाभुत सुविधांचे मोठे नुकसान झाले असून त्यामुळे सबंधित ग्रामस्थ मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

सादर करण्यात आलेली ग्रामपातळीवरील कामे केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी व राज्य शासनाच्या राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत पूर, चक्रीवादळ इत्यादी आपत्ती व्यवस्थापन, पूर नियंत्रण व दुरूस्तीअंतर्गत प्रस्तावित करता येतील याकडे खा. लंके यांनी या निवेदनात जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले आहे.



ही कामे मार्गी लावल्यानंतर या गावांतील ग्रामस्थांना सोयी–सुविधा मिळणार असून ग्रामस्थांचे पुनर्वसन, सुरक्षित प्रवास आणि अंत्यसंस्कार, धार्मिक विधींसाठी सुविधा उपलब्ध होतील. त्यामुळे या कामांच्या निधीसाठी आपत्ती व्यवस्थापन निधी अंतर्गत तातडीने मंजुरी देण्यात यावी व कार्यवाहीस गती देण्यात यावी अशी मागणी खा.निलेश लंके यांनी केली आहे.

या निवेदनामध्ये खा. लंके यांनी पुढील गावांमध्ये विविध कामे प्रस्तावित केली आहेत.

**सारोळा कासार** – स्मशानभूमी दुरूस्ती व सुशोभीकरण, काळे वस्ती येथील दोन पुलांची दुरूस्ती, दशक्रिया विधी घाट दुरूस्ती व सुशोभिकरण, बारे मळा शाळेसमोरील परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविणे, दत्त मंदिरासमोरील परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविणे, सारोळा गावठाण ते कडूस वस्ती रस्ता दुरूस्ती करणे.

**अस्तगाव** – स्मशानभूमी दुरूस्ती व सुशोभिकरण, स्मशानभूमीशेजारील रस्ता व सीडी वर्क, अस्तगांव गावठाण ते तरोडी रस्ता दुरूस्ती, गावठाण ते गाढवे वस्ती रस्ता दुरूस्ती.

**खडकी** – स्मशानभुमी दुरूस्ती व सुशोभिकरण, खडकी ते जाधव मळा रस्ता व सीडी वर्क, खडकी सोसायटी ते नगर दौंड महामार्ग रस्त्याचे कॉंक्रीटीकरण.

**वाळकी** – वाळकी ते गुंडेगाव रस्ता व सीडी वर्क, गावठाण ते अमरधाम रस्ता दुरूस्ती, जुंदरे मळा रस्ता दुरूस्ती, बोठे वस्ती, जुंदरे वस्ती, अमरधाम जवळील बंधारे दुरूस्ती.

**भोरवाडी** – वडवस्ती ते खैरे वस्ती रस्ता दुरूस्ती, नवीन खडकवाडी पूल दुरूस्ती व सीडी वर्क, गावठाण ते घुले वस्ती रस्ता दुरूस्ती.

**अकोळनेर** – गावठाण ते मेहेत्रे वस्ती रस्ता व ३ ठिकाणी सीडी वर्क, जाधववाडी रस्त्यावर २ ठिकाणी सीडी वर्क, दरोडी मळा, थोरात वस्ती, देशमुख मळा रस्ते दुरूस्ती.

**सोनेवाडी** – सोनेवाडी–जाधववाडी रस्त्यावरील पुल, सीडी वर्क, बोगरे हॉस्पिटल ते कुबाडे मळा रस्त्यावरील सीडी वर्क, दरेवस्ती, पाटील मळा, गोपळ वस्ती, दळवी वस्ती येथे सीडी वर्क.

# अपघाताचा बनाव करून नगरमधील तरुणाचा खून केल्याचे तपासात उघड

## दोघे संशयित अटकेत तर आणखी ४ पसार आरोपींचा पोलिसांकडून शोध सुरु



आदेश घोरपडे (मयत)

नगर – प्रेमप्रकरणातून तरूणाचा खून करून तो अपघात असल्याचा बनाव केल्याची धक्कादायक घटना नगर तालुका पोलिसांच्या तपासातून उघडकीस आली आहे. सुरूवातीला अपघाताचा गुन्हा दाखल झालेल्या या प्रकरणात आता खून, कटकारस्थान आणि बनाव या गंभीर कलमांची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी या प्रकरणात दोन जणांना अटक केली असून न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. मृत तरूणाच्या प्रेमप्रकरणातून सूड घेण्यासाठी ही हत्या केल्याचे तपासात समोर आले आहे.

ही घटना ३० मे रोजी सायंकाळी टाकळी काझी (ता. नगर) शिवारातील हॉटेल रायबा समोर घडली. आदेश नंदू घोरपडे (वय २२, रा. कायनेटिक चौक, अहिल्यानगर) हा तरूण आणि त्याचा मित्र मोहित संतोष निमसे (वय २०, रा. रंगोली चौक, केडगाव) दुचाकीवरून नगरच्या दिशेने येत असताना समोरून आलेल्या पिकअपने जोरदार धडक दिल्यामुळे घोरपडे याचा मृत्यू झाला होता. मोहित निमसे याने या प्रकरणी २ जून रोजी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार अज्ञात पिकअप चालकाविरूध्द अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, मृत घोरपडेच्या आईने हा अपघात नसून तिच्या मुलाचा खून झाल्याचा संशय पोलिसांकडे व्यक्त केला होता. त्यामुळे पोलिसांनी तपासाची दिशा बदलून अधिक सखोल चौकशी केली असता, ही हत्या असल्याचे निष्पन्न झाले.

यासंदर्भात तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते यांनी सांगितले की, आदेश घोरपडे याचे बीड जिल्ह्यातील दादेगाव (ता. आष्टी) येथील एका मुलीसोबत प्रेमसंबंध होते. मात्र तिच्या कुटुंबीयांनी तिचे लग्न दुसऱ्या मुलासोबत ठरवले होते. याची माहिती घोरपडे याला मिळाल्यानंतर त्याने मोहित निमसे व इतर चार मित्रांसह ३० मे रोजी दादेगाव गाठले. तेथे मुलीच्या नातेवाईकांशी त्याचा वाद झाला. या वादानंतर घोरपडे व निमसे दुचाकीवरून पळून आले, तर त्यांचे इतर मित्र चारचाकीने परतले. यानंतर मुलीच्या नातेवाईकांनी पाठलाग सुरू केला.

दरम्यान, घोरपडे व निमसे हे टाकळी काझी शिवारातून जात असताना पिकअप वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत घोरपडे जागीच ठार झाला. हा अपघात नसून पूर्वनियोजित कट असल्याचे तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणात पोलिसांनी विश्वजीत सुभाष पोटे (वय २५) आणि संकेत बाळासाहेब बंडाले (वय २७, दोघे रा. दादेगाव) यांना अटक केली आहे. त्यांची चौकशी सुरू असून आणखी चार जणांचा या कटात सहभाग असल्याचे समोर आले आहे. या चार जणांचा शोध सुरू असल्याचे गिते यांनी सांगितले. त्यांच्या विरुद्ध अपघाताच्या गुन्ह्यात आता बीएनएस कलम १०३ (१), ६१ (२) असे कट रचून खुन केल्याचे कलम वाढवण्यात आले आहे.

# कत्तलीसाठी गोवंशीय जनावरांची ‘महिंद्रा स्कार्पिओ’मधून वाहतूक

## नगर–पुणे रोडवर पोलिसांनी एकाला वाहनासह घेतले ताब्यात

नगर – बेकायदेशीररित्या गोवंशीय जनावरांची कत्तल करण्याच्या उद्देशाने महिंद्रा स्कार्पिओ गाडीतून वाहतूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. नगर तालुका पोलिसांनी नगर–पुणे रोडवर कामरगाव पुलाजवळ वाहनचालकास वाहनासह ताब्यात घेत २ जर्सी गोऱ्ह्यांची सुटका केली आहे. ही कारवाई ३ जून रोजी रात्री २.४५ च्या सुमारास करण्यात आली आहे.

याबाबतची माहिती अशी की, नगर–पुणे रोडने एक स्कार्पिओ गाडी (क्र. एम एच १६ ए बी ५४५४) दोन गोवंशीय जातीचे जर्सी गोऱ्हे कत्तल करण्यासाठी नगरकडे घेवून येत असताना त्या गाडीचा किरकोळ अपघात झाला. या अपघातामुळे स्कार्पिओ चालक बेशुद्ध पडला. घटनास्थळा जवळील नागरिकांनी ही घटना पोलिसांना कळविली. पोलीस घटनास्थळी पोहोचले असता वाहन चालक बेशुद्ध पडलेला होता व त्याच्या ताब्यातील वाहनाच्या काचा फुटलेल्या दिसून आल्या. पोलिसांनी वाहन चालकास औषध उपचाराकरिता खासगी रुग्णवाहिकेतून दवाखान्यात पाठवले. तेथील जमलेल्या लोकांनी जनावरे ओरडत असल्याने ते सोडले असता उधळून पळून गेले असे पोलिसांनी सांगितले. या जनावरांचा शोध घेतला असता ते मिळून आले नाहीत.

याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात पो. हे.कॉ. जगदीश जंबे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वाहन चालक मोहसीन मेहबूब खान (वय ४४२, रा. कोठला, अ नगर) याच्याविरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११ (१), महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम ९ (अ), मोटार वाहन कायदा कलम ८३,१७७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार खंडेराव शिंदे करीत आहेत.

# झारखंड येथून अल्पवयीन मुलीचे अपहरण करणाऱ्यास नगरमध्ये पकडले



झारखंड येथुन अल्पवयीन मुलीस पळवुन आणणाऱ्या तरुणाला नागापूर येथे पकडल्यानंतर त्याच्यासमवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

नगर – झारखंड येथुन अल्पवयीन मुलीस पळवुन आणणाऱ्या तरुणाला नगरच्या एम आयडीसी पोलिसांनी नागापूर येथे पकडले असून आरोपीसह पिडीत मुलीला फतेहपूर पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

या बाबतची माहिती अशी की, १४ वर्षीय अल्पवयीन मुलीस २४ मे २०२५ रोजी पहाटे ४ वाजण्याचे सुमारास कोणीतरी अज्ञात इसमाने पळवून नेल्या प्रकरणी फतेहपुर पोलिस ठाणे झारखंड येथे बी.एन एस कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल झाला आहे. त्या गुन्ह्याबाबत झारखंड पोलीसांनी वायरलेसद्वारे माहिती दिली होती. या गुन्ह्याबाबत सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांना माहिती मिळाली की या गुन्ह्यातील आरोपी हा एमआयडीसी नागापुर येथे पिडीत मुलीसोबत राहत आहे, अशी माहिती मिळाल्याने एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या पथकाने नागापूर परिसरातून मथान उमेश मुरुमु (वय २०, रा. दुलाडे जि. जमदडा, झारंखड) यास त्या मुलीसह ताब्यात घेतले. आरोपी व पिडीत मुलीस पुढील कार्यवाहीकरीता झारखंड पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, पोलीस उप अधीक्षक अमोल भारती यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. माणिक चौधरी, उपनिरीक्षक भालेराव, पोलिस अंमलदार दिवटे, कावरे, मिसाळ, भागवत, किशोर जाधव, अक्षय रोहोकले, दहिफळे, सोनाली जाधव यांचे पथकाने केली आहे.

# दारु पिण्यासाठी पैसे मागून वृद्ध महिला व तिच्या भावास मारहाण; गुन्हा दाखल

नगर – दारु पिण्यासाठी पैशाची मागणी करुन ७५ वर्षीय वृद्ध महिलेस व तिच्या भावास लाकडी दांडक्याने मारहाण केल्याची घटना सर्जेपुरा परिसरातील रामवाडी येथील दादा गॅरेज समोर ४ जून रोजी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत ताराबाई गंगाराम अकोलकर (रा. रामवाडी, दादामिया गॅरेज समोर, सर्जेपुरा) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा भाऊ सुरेश गंगाराम अकोलकर त्याच्या कुटुंबासह फिर्यादी यांच्या घरासमोर राहतो. सुरेश याचा मुलगा संतोष हा नेहमी दार पिऊन घरात भांडण करतो. ४ जून रोजी सकाळी सुरेश अकोलकर यांच्या घरात भांडणे सुरु असताना फिर्यादी या त्यांच्या भावाच्या घरी गेल्या असता त्यांचा भाचा संतोष हा त्याचे आई वडिलांसोबत दारु पिण्यास पैसे दे असे म्हणून भांडत होता. तेव्हा फिर्यादी या त्यास समजावून सांगत असताना तू भांडू नको असे बोलल्या, याचा त्याला राग आला. त्याने फिर्यादी व फिर्यादीच्या भावास मी तुम्हाला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली आणि लाकडी दांडक्याने दोघांना बेदम मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादी व त्यांचा भाऊ दोघे जखमी झाले. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी ताराबाई अकोलकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन संतोष अकोलकर यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### ताण कमी करण्यासाठी करा बलासन

योगा मॅटवर गुडघ्याच्या सहाय्यावर बसा दोन्ही पायाची तळवे आणि टाचांना एकत्रित आणा हळूहळू आपले गुडघे शक्य तितके पसरवा. दीर्घ श्वास घ्या आणि पुढे झुका दोन्ही मांड्यांच्या मध्ये पोट घ्या आणि श्वास सोडा. कंबरेच्या मागच्या बाजूच्या भागात त्रिकास्थिला रुंद करा. आता नितंबाला वाक देऊन नाभीकडे खेचण्याचा प्रयत्न करा. आहे त्या स्थितीत स्थिर राहा मानेच्या मागे डोके किंचित उचलण्याचा प्रयत्न करा. टेलबोनला पेल्विसकडे खेचण्याचा प्रयत्न करा. हात समोर आणा आणि आपल्या समोर ठेवा. दोन्ही हात गुडघ्यांच्या रेषेत राहतील. दोन्ही खांदे जमीनीला स्पर्श करतील यासाठी प्रयत्न करा. तुमच्या खांद्याचा ताण शोल्डर ब्लेडपासून पूर्ण पाठीमध्ये जाणवला पाहिजे. ३० सेकंद ते काही मिनिटे या स्थितीत रहा. हळूहळू हात पुढे ताणत श्वास घ्या. पेल्विसला खाली वाकवून टेलबोनला उचला आणि सामान्य स्थितीत परत या. बालासन केल्याने अनेक फायदे मिळतात. हे आसन तणाव कमी करते, पचन सुधारते.

## पाककला

### सत्तूच्या पिठाची सुकडी

**साहित्य :** १ कप सत्तूचे पीठ, १ कप साजूक तूप, १ कप गुळ, २ टेबलस्पून ड्रायफ्रूट पावडर, १/२ टेबलस्पून इलायची पावडर

**कृती :** सर्वात आधी दिल्याप्रमाणे सगळे साहित्य काढून घेतले. कढईत साजूक तूप गरम करून त्यात सत्तू पीठ गुलाबी रंगावर भाजून घेतले. आता त्यात ड्रायफूट पावडर टाकून मिक्स करून घ्यावे. इलायची पावडर टाका. आता गॅस बंद करून थोड्यावेळाने त्यात गुळ टाकून मिक्स करावे. गुळ चांगला मिक्स करायचा.

ताटाला तूप लावून त्यावर सुकडी टाकावी. आता थोडे थंड झाल्यानंतर सुरीने सुकडीचे पीस करून घ्यावेत. मस्त तयार सुकडी आपल्या डब्यात भरावी व लागेल तशी खावी.

## वास्तू

### कार्यालयसंबंधी

* कार्यालयाचे प्रवेशद्वार उत्तर किंवा ईशान्य किंवा वायव्य दिशेने असावे. हे दिशानिर्देश शुभ मानले जातात आणि सकारात्मकता आणतात.

* उत्तर दिशेला संपत्तीच्या स्वामीची दिशा म्हणूनही ओळखले जाते. हे आपल्याला आर्थिक नफ्यात गती देण्यास मदत करेल.

* कोणत्याही कार्यालयाचे स्वागत कक्ष ईशान्य किंवा पूर्व दिशेने बांधले पाहिजे. रिसेप्शनिस्ट उत्तर किंवा पूर्वेकडे तोंड करून बसलेला/बसलेली असावा/असावी.

* लोगो किंवा कंपनी प्रोफाइल स्वागत क्षेत्राच्या दक्षिण भिंतीवर असावे. वास्तू असेही म्हणते की रिसेप्शन टेबल ऑफिसच्या दाराच्या काटकोनात ठेवावे.

## सल्ला

* गुळाचा पाक बनवताना अगोदरच कढईला तेल किंवा तूप लावून मग पाक केलातर गुळाचा पाक कढईला चिटकत नाही.

* जर दुधाच्या मलईमध्ये १ चमचा साखर घालून मग त्याचे लोणी काढले तर लोणी जास्त निघते.

## सौंदर्य

कोरियन स्किन ही सध्या सगळ्यात जास्त ट्रेंडमध्ये आहे. कोरियन त्वचा ही खूपच नितळ आणि काचेसारखी असते. ही त्वचा मिळवण्यासाठी डबल क्लिन्झ पद्धत वापरतात. त्यामुळे त्वचा अधिक चांगली दिसते. याशिवाय फेस मसाज, फेस क्लिन्झिंग ही त्वचा अधिक सुंदर राहते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ६ जून २०२५

**निर्जला (स्मार्त) एकादशी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, ज्येष्ठ शुक्लपक्ष, हस्त ०६|३४, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील. मागील उधारी वसुल होईल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**वृषभ :** मानसिक स्थिती आनंददायक राहील. वैवाहिक जीवनात सुख मिळेल. आनंदाची बातमी मिळेल. वास्तुखरेदीसाठी चांगले योग आहेत.

**मिथुन :** कामास विलंब झाला तरी यश मिळेल. नोकरदारांना इतर व्यक्तींची मदत घेऊन कामे करावी लागतील. तरुणांना परदेशागमनाचे योग येतील.

**कर्क :** कौटुंबिक विषयांमध्ये आशादायक काळ आला आहे. खर्च अधिक होईल. व्यापार व्यवसायात आशादायक परिणाम मिळतील. वाहने व उपकरणे बिडतील.

**सिंह :** जोखीम असलेल्या कार्यात गुंतवणूक केल्याने नुकसान होईल. आर्थिक स्थिती बिघडेल.

**कन्या :** मित्रांचा पाठिंबा मिळेल. भावनात्मकतेमुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. निष्काळजीपणा अंगलट येईल. मागील उधारी वसुल होईल.

**तूळ :** मोठ्यांचा सल्ला घ्याल. आरोग्य चांगले राहील. एखाद्या जुन्या मित्राशी भेट होईल. भाऊबंद डोके वर काढतील.

**वृश्चिक :** पैशासंबंधी स्थिती ठीक राहिल. इच्छित विषयांमध्ये यश मिळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्त्रियांना कापणे, चिरणे आदी किरकोळ अपघात होतील.

**धनु :** धर्मविषयक कामामध्ये पैसा खर्च होईल. सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल साहाय्याबरोबर सन्मान वाढेल.


**मकर :** आर्थिक विषयांमध्ये स्थिती चांगली राहील. स्त्री पक्षाकडून लाभ मिळेल. कार्यालयामध्ये सहकार्य मिळेल. वाहने व उपकरणे बिघडतील.

**कुंभ :** आर्थिक विषयांमध्ये देवाण-घेवाण टाळाल. आरोग्य नरम-गरम राहील. खाण्या-पिण्याविषयीची पथ्य न पाळल्याने तब्येत बिघडेल.

**मीन :** मित्रांचा सहयोग मिळेल. शुभ वार्ता देखील मिळतील. एखादे कार्य झाल्यामुळे आनंदाचा अनुभव येईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## फिल्मीचक्कर क्र. ११९१ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) गोविंदा, रविना टंडन, कादरखान यांचा एक चित्रपट ५) +++ सिप्पी (शोले चित्रपटाचे दिग्दर्शक) ७) ++++ का सिकंदर (चित्रपटाचे नाव) ८) 'एक दूजे के लिये' चित्रपटाचा नायक १२) ऑस्कर पुरस्कार प्राप्त हिंदी चित्रपट संगीतकार - आर. ++++ १४) शशी कपूर, राखी, रेखा, राजकिरण, पूनम धिल्लन आदींच्या यात भूमिका आहेत १५) ऋषी कपूर, अश्विनी भावे, झेबा बख्तियार यांचा एक चित्रपट

**उभे शब्द :-** १) +++ ++++ अँथनी (चित्रपटाचे नाव) २) 'जब जब फूल खिले' चित्रपटाची दिवंगत नायिका ३) सुनील शेट्टी, करिश्मा कपूर, सोनाली बेंद्रे यांचा एक चित्रपट ४) शेखर कपूर, डिंपल कापडिया यांचा एक चित्रपट ६) एक दिवंगत गीतकार - +++ बदायुनी ९) 'ए दोस्ती ++ ++ तोडेंगे ('शोले'मधील गाणे) १०) +++ अपना अपना (चित्रपटाचे नाव) ११) सुनील दत्त, विम्मी, राजकुमार, मुमताज, बलराजा सहानी, मदन पुरी यांचा एक चित्रपट १३) ड्रीम गर्ल - ++ मालिनी

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** सज्जन म्हणून जन्माला येणे हा योगायोग, पण सज्जन म्हणून मरणे ही आयुष्यभराची कमाई होय.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### प्लॅस्टिकच्या स्टुलामध्ये मधोमध छिद्र का असते?

आताच्या जीवनशैलीमध्ये प्लास्टिक आपल्या रोजच्या वापरातील वस्तूंपैकी एक महत्त्वाची वस्तू बनलं आहे. प्लास्टिकच्या वस्तूंचा वापर आपल्या दैनंदिन व्यवहारात मोठ्या प्रमाणात होतो. मानवी जीवन जणू प्लास्टिकविना शक्यच नसल्यासारखी परिस्थिती आहे. आपण आपल्या घरात बऱ्याच वस्तू प्लास्टिकच्या वापरतो. स्टूल, टेबल, खुर्च्या प्रत्येक घरात असतात. त्यातीलच एक म्हणजे प्लास्टिक स्टूल आजकाल प्रत्येक घरांमध्ये बसण्यासाठी प्लास्टिकच्या स्टुलचा वापर होतो. दैनंदिन जीवनात तुम्ही स्टूल रोज पाहता आणि त्यावर बसताही. मात्र, त्यावर एक छिद्र असते, ते कशासाठी असते? त्यामागचं नेमकं कारण काय? तुम्हाला माहिती आहे का? चला तर मग स्टुलाच्या वरच्या बाजूला, तुम्ही ज्या ठिकाणी बसता त्या ठिकाणी छिद्र का असतं? जाणून घेऊया...

आपल्या प्रत्येकाच्या घरामध्ये रंगीबेरंगी, विविध आकाराचे स्टूल असतात, जे दिसायला फार आकर्षक दिसतात व ते लवकर खराब होत नाहीत, वर्षानुवर्षे टिकतात. जर एखादी जास्त वजन असलेली व्यक्ती स्टुलावर चढली तर स्टूल डळमळत नाही किंवा तुटतही नाही. यामागे छिद्रांची मुख्य भूमिका आहे. एक लहान छिद्र इतके जास्त वजन कसं पेलतं? यामागे काही कारणं आहेत. प्लास्टिकचे स्टूल बनवणारी कंपनी लहान असो वा ब्रँडेड असो, स्टुलामध्ये छिद्र नक्की असतं. खरंतर प्लास्टिकच्या वस्तू बनवणारे कारखाने त्या प्रॉडक्शनसाठी विज्ञानाच्या काही सामान्य नियमांचे पालन करीत असतात.

विज्ञानाच्या नियमानुसार, स्टूल उत्पादनासाठी विज्ञानाच्या नियमांचं पालन केलं जातं. अशात स्टूल जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात तयार होत असेल तर त्याच्या मधोमध एक छिद्र असतंच. स्टुलाच्या मध्ये छिद्र असण्याची वेगवेगळी कारणं आहेत. कारणे कोणती आहेत, जाणून घेऊया.....

पहिलं कारण म्हणजे, गोल आकाराचे छिद्र स्टुलाच्या वरच्या बाजूला केले जाते. ते चौरस, त्रिकोण किंवा इतर कोणत्याही आकाराचे नसतात. दुसरं कारण म्हणजे, घरात किंवा दुकानात जागेच्या कमतरतेमुळे स्टूल एकावर एक टाकून ठेवले जातात. जर या स्टूलमध्ये छिद्र नसेल तर ते एकमेकांमध्ये अडकतात. एयर प्रेशर आणि व्हॅक्युममुळे ते वेगळे करण्यासाठी फार जास्त शक्ती लागते. त्यामुळे त्यावर छिद्र असल्याने ते वेगळे करणे सोपं होतं. प्लास्टिकच्या स्टुलाला छिद्र पाडण्याचे तिसरे महत्त्वाचे कारण म्हणजे, त्याच्या आत बोट घालणे सोपे होते.

जर छिद्र मोठे केले तर स्टूल लवकर तुटतो, यामुळे छिद्राचा आकारदेखील काळजीपूर्वक तयार केला गेला आहे. शिवाय प्रत्येक स्टुलामध्ये हे छिद्र ठेवल्यामुळे कंपनीचे काही प्रमाणात मटेरियल म्हणजेच प्लास्टिकची देखील बतच होते, म्हणूनच प्लास्टिकच्या स्टुलामध्ये छिद्र असतं.

### सितेचा पतीवियोग

रामाशी सीतेचा विवाह होण्यापूर्वी एकदा सीतेला मैत्रिणींसह उद्यानात विहार करीत असता पोपटाची एक जोडी दिसली. उद्यानातील एका झाडावर बसून ते बोलत होते, पृथ्वीवर श्रीराम नावाचा सुंदर व पराक्रमी राजा होईल. सीता त्याची महाराणी होईल. सर्व राजांना जिंकून घेऊन सीतेसह श्रीराम अनेक वर्षे अयोध्येचे राज्य सुखाने करील. पोपटाची ती बोली ऐकून सीतेने विचार केला, ही तर माझ्याच जीवनाची कथा ! या पक्ष्यांना पकडून सर्व हकिगत सविस्तर जाणून घ्यावी. मैत्रिणींना सांगून सीतेने त्या जोडप्याला पकडले व सीतेच्या स्वाधीन केले.

मग सीतेने त्यांना हळुवारपणे विचारले, राम सीतेच्या कथेची तुम्हाला कशी माहिती ? यावर त्या जोडप्याने सांगितले, वाल्मीकी नावाचे ऋषी आहेत. आम्ही त्यांच्याच आश्रमात राहातो. त्यांनी रामायण नावाचा ग्रंथ लिहिला असून ते व त्यांचे शिष्य रात्रंदिवस त्याचेच मनन, चिंतन करीत असतात. आम्ही ती कथा वारंवार ऐकली आहे. भगवान विष्णू श्रीरामाच्या रुपाने अयोध्येत जन्म घेतील. विश्वामित्रांसह ते मिथिलेस येतील. येथेच एक मोठे धनुष्य तोडून जनकाची मुलगी सीता हिच्यासह विवाह करतील. पण तू हे इतके उत्सुकतेने का ऐकत आहेस? यावर सीतेने आपली ओळख सांगितली व आता श्रीरामाचे येथे

माझा पत्नी म्हणून स्वीकार करेपर्यंत तुम्ही येथेच सुखाने राहायचे आहे. असे सांगितले. यावर तो पोपट म्हणाला, ही माझी पत्नी लवकरच पिलास जन्म देणार आहे. तरी तू आता आम्हाला सोड. पिलू जन्माला आल्यावर मी स्वतः तिला इथे घेऊन येईन. पण सीतेने ते न ऐकता त्या पोपटाला एकट्याला परत जाण्यास सांगितले. त्यामुळे ते जोडपे दुःखी होऊन आपण उगाचच श्रीराम कथेची चर्चा केली, असे म्हणू लागले. वारंवार विनंती करूनही सीता त्या पक्षिणीस सोडायला तयार होईना. तेव्हा तिने रागावून शाप दिला, की ज्या प्रकारे मी गर्भिणी असता तू मला पतीपासून विलग करते आहेस, तशीच वेळ तुझ्यावर येईल. एवढे बोलून पतीच्या विरहाने व्याकूळ होऊन त्या पक्षिणीने प्राण सोडला. तो पोपट शोक करीत म्हणाला, मी अयोध्येत जन्म घेईन. माझ्याच बोलण्याने उद्विग्न होऊन तुझा पती तुझा त्याग करील.

क्रोध व अपमानाने प्रेरित होऊन त्याने अयोध्येत धोब्याचा जन्म घेतला व पुढचे रामायण घडले. पूर्वकाळातील एका पक्ष्याचा शाप सीतेस भोगावा लागला.

## जीवन का अमृत (भाग १)



सत्गुरु हमेशा प्रेम, नम्रता, सहनशीलता, नेक बोली और नेक विचारों का पाठ पढ़ाते हैं। नेक कार्यों में कुछ खर्च नहीं होता, पर इनसे एक ऐसी शक्ति पैदा होती है, जो हर किसी को, जो ऐसे व्यक्ति के संपर्क में आता है, धन्य कर जाती है। किसी जरूरतमंद की सहायता करना हमारा नैतिक कर्तव्य है और जहाँ तक संभव हो, हम इसका पालन करें।

आध्यात्मिक लक्ष्य की प्राप्ति में सत्संग शिष्य की बहुत सहायता करता है। यहाँ (सत्संग में) हमें पवित्र शिक्षाओं की सही समझ आती है। सत्संग हमारे सिर पर कार्यरत गुरु शक्ति के प्रति हमारी श्रद्धा और भक्ति को भी बढ़ाता है। और इसमें आने

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

वाले लोगों को कार्यरत गुरु-शक्ति से जिंदगी का उभार मिलता है, जो कि एक दुर्लभ वरदान है।

हमें अक्सर अपने साथियों की छींटाकशी और परंपरागत धार्मिक संस्थाओं के सुसंगठित विरोध का सामना करना पड़ता है । पर अगर हम पूर्ण आत्म समर्पण से सत्गुरु के प्यार में बँधे रहें, तो कोई भी हमारे मन की शांति भंग नहीं कर सकता, न ही हमारे आध्यात्मिक सामंजस्य को बिगाड़ सकता है। शायद शुरू-शुरू में, पूर्व के लोगों के लिए रूहानी रास्ते पर चलना पश्चिमी लोगों की अपेक्षा ज्यादा आसान है। उदाहरण के लिए, भारत वर्ष में पुराने समय से ही जिंदा गुरु को ढूँढने और उसका अनुसरण करने की परंपरा रही है। ऐसी प्रथा पश्चिमी लोगों के लिए नई बात है, क्योंकि उनकों बताया जाता है कि ईसा मसीह के बाद और कोई महात्मा इस संसार में जन्म नहीं लेगा। पर यह फर्क इतना फायदेमंद नहीं, जितना कि लगता है, क्योंकि रूहानियत में असली फायदा तो आंतरिक है, बाहरी नहीं। यह फायदा बाहरी विरोध के होने या न होने पर निर्भर नहीं है, बल्कि हमारे प्रेम और आत्मसमर्पण की आंतरिक क्षमता पर निर्भर है। बाहरी अवरोध असल में, हमारी परीक्षा लेते हैं और हमारी इस आंतरिक क्षमता के विकास को तीव्र कर सकते हैं। अपने अहंकार पर विजय पाना और अपने आपको प्रभु इच्छा के सामने समर्पित करना, जितना दुर्लभ पूर्व में है, उतना ही पश्चिम में; और जहाँ कहीं भी ये मिलेंगे,

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

निन्दा और चुगली भी इसी उर्जा चक्र में हैं। मनुष्य के पिछले जन्मों की कहानी इसी चक्र में है। उत्थान और पतन इसी चक्र के कारण होता है। शरीर का नियंत्रण यहीं से होता है। इस चक्र की शुद्धि हो जाये तो हम निरोगी बन जाते हैं। यह उर्जा चक्र हमारे दिमाग की पीनियल नामक ग्रंथि में विराजमान है। दूसरे शब्दों में आज्ञा चक्र और पीनियल ग्रन्थि एक ही चीज हैं। पीनियल ग्रंथि मास्टर ग्रंथि है जो शरीर की सभी ग्रंथियों को तथा दिमाग के अलग अलग क्षेत्रों को नियंत्रित करती है उन्हें आदेश देती है।

आज्ञा चक्र -२

आज्ञा चक्र एक प्रकाश का बिंदु है जिसे आत्मा कहते हैं और भृकुटी की सीध में दिमाग के अन्दर स्थित है। यह चक्र मन, बुद्धि और संस्कार का मिलन स्थान है। इड़ा और पिंगला नाम की दो नाड़ीयां यहां मिलती हैं जिन से प्रकाश निकलता

### आज्ञा चक्र

रहता है उस प्रकाश से यहां दो ध्वनियां निकलती रहती हैं। ये इड़ा और पिंगला हमारे बायें और दायें नाक से जुड़ी नाड़ीया हैं।

यह चक्र ब्रहस्पति ग्रह का केन्द्र है। ब्रहस्पति ग्रह से निकल रही चुम्बकीय एवं प्रकाश की किरणें इस चक्र को सीधा प्रभावित करती हैं। जब आज्ञा चक्र (भृकुटी) पर ध्यान किया जाता है तो तीन बडी शक्तियां, आत्मा, परमात्मा और प्रकृति मिल कर विश्व चेतना में बदल जाती हैं।

आज्ञा चक्र पीनियल ग्रंथि और पिचुटरी ग्रंथि को मुख्य रुप से प्रभावित करता है और ये दोनो ग्रंथियां शरीर के भिन्न भिन्न भागों को प्रभावित करती हैं और शरीर से कार्य करवाती हैं। मनुष्य के जन्म से लेकर १०-१२ वर्ष तक आज्ञा चक्र पीनियल ग्रंथि के द्वारा सारे शरीर को नियंत्रित करता है। इसके बाद आज्ञा चक्र शरीर के कुछ भागो का नियंत्रण पिचुटरी ग्रंथि को सौंप देता है। विशेष रूप से ब्रह्मचर्य से सम्बन्धित कार्य । पीनियल ग्रंथि और पिचुटरी ग्रंथी अपने हार्मोनस द्वारा सारे शरीर को चलाती हैं। अगर हम इन ग्रंथियों पर नियंत्रण कर लें तो हम मन चाहा लक्ष्य वा स्वास्थ्य प्राप्त कर सकते हैं। जो राजयोगी या हठ योगी बीमार रहते हैं इसका सीधा सा अर्थ है कि अभी आज्ञा चक्र से ऐसी शक्ति नहीं बन रही है जो उपरोक्त दो ग्रंथियों को नियंत्रित कर सके। अभी समझने और समझाने का काम ज्यादा करते हैं। योग तो लगाते हैं परंतु इतना नहीं लगाते या लगता नहीं, जिस से बल बने।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**डॉक्टर :** तुम्हाला मलेरिया झाला आहे... **पेशंट :** डॉक्टर, खरच मलेरिया झालाय ना? एकदा एकाला डॉक्टरांनी मलेरियाची औषधे दिलीत पण तो टॉयफाईडने मेला... **डॉक्टर :** नाही, माझे रुग्ण मलेरियाचे औषध दिल्यावर मलेरियानेच मरतात

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* लोकसभेचे महासचिव कोण?

– उत्पलकुमार सिंह

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

उपचार अष्टांग संग्रह, उत्तर स्थान २/४४ वाग्भटाचार्यांनी दन्तोदभवजन्य व्याधींच्या उपचाराचा विचार करताना या आजारामुळे निर्माण होणारी लक्षणे जर जास्त प्रमाणात प्रभावी नसतील तर अशा बालकाला कोणत्याही प्रकारच्या उपचारांची गरज नसते. दात निघण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ही लक्षण दात निघण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ही लक्षणे आपोआपच कमी होतात. असे सांगितले आहे.

म्हणून दात निघण्याच्या काळात उत्पन्न होणाऱ्या आजारांवर बालकाच्या आहारावर नियंत्रण ठेवू नये व सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विनाकारण औषधांचा अति

### बालकांचे आजार

वापर करू नये. फक्त आजाराचे स्वरूप जर जास्त प्रमाणात असेल, तर तज्ज्ञ बालरोग चिकित्सकांच्या सल्ल्याने त्या त्या आजारावरचे उपचार करावेत. आयुर्वेदामध्ये दात निघण्याच्या काळामध्ये डिकेमाली चूर्ण हे हिरड्यांवर चोळण्यास सांगितले आहे. यामुळे हिरड्यांची सळसळ थांबून वेदना कमी होतात. तसेच उगवलेल्या दातांनाही लावावी. यामुळे लहान मुलांचे दात सहजपणे, त्रास न होता व लवकर येतात. तसेच दात निघताना येणारा ताप, उलटी, मळमळ, जुलाबासारखे आजार नष्ट होतात. पथ्यापथ्य - दात निघण्याच्या काळात बालक जमिनीवरील कोणतीही वस्तू उचलून तोंडात घालते. यामुळे बालकामध्ये जंतुसंसर्ग वाढतो. अशा वेळी जंतुसंसर्ग होऊ नये म्हणून सहसा बालकाला स्वच्छ जागेत खेळायला ठेवून स्वच्छ धुतलेली खेळणी खेळण्यास द्यावी व बालन तोंडात कोणतीही वस्तू घालणार नाही, याकडे लक्ष ठेवावे.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००




महावितरणच्या वर्धापनदिन व विद्युत सुरक्षा सप्ताहनिमित्त अहिल्यानगर महावितरण मंडल कार्यालयाच्या वतीने शहरातून विद्युत सुरक्षितता जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार, कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, अतिरिक्त कार्यकारी अभियंता भाऊसाहेब कुमावत, एचआर मॅनेजर रेणुका सूर्यवंशी आदींसह सर्व अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते.

# जनजागृती रॅली व पथनाट्याने महावितरणचा 'वर्धापनदिन' व 'विद्युत सुरक्षा सप्ताह' साजरा

नगर – महावितरणच्या २० व्या वर्धापनदिनानिमित्त, विद्युत सुरक्षा सप्ताह व पर्यावरण दिनानिमित्त अहिल्यानगर महावितरणच्या शहर व ग्रामीण विभाग कार्यालयाच्या वतीने विद्युत सुरक्षा व वसुंधरा संवर्धन जनजागृती रॅलीचे आयोजन गुरुवारी करण्यात आले होते. जुन्या बसस्थानक चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून महावितरणचे अधिक्षक अभियंता रमेशकुमार पवार यांच्या हस्ते रॅलीचे उद्घाटन झाले. या रॅलीत महावितरणचे अधिकारी व कर्मचारी हातात जनजागृतीचे फलक घेत व घोषणा देत सहभागी झाले होते. तसेच रॅलीत ठिकठिकाणी विद्युत सुरक्षिततेची जनजागृती करणारे व कर्मचारी जीव धोक्यात घालून देत असलेल्या सेवेबाबतची माहिती देणारे पथनाट्यही सादर करण्यात आले.

ही जनजागृती रॅली बसस्थानक शिवाजी महाराज पुतळा, माळीवाडा वेश, पंचपिर चावडी, शनि चौक, गुजर गल्ली, लक्ष्मी कारंजा, चितळे रोड मार्गे तेलीखुंट येथील महावितरणच्या कार्यालयात समाप्त झाली. रॅलीत कर्मचाऱ्यांनी विजेच्या सुरक्षिततेचे पॉपलेटचे वाटप नागरिकांना केले. यावेळी महावितरणचे अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार, कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, अतिरिक्त कार्यकारी अभियंता भाऊसाहेब कुमावत, एचआर मॅनेजर रेणुका सूर्यवंशी, उपकार्यकारी अभियंता उमाकांत सपकाळे, सहाय्यक कार्यकारी अभियंता स्वप्नील उल्हे व अनिल आवारी आदी प्रमुख अधिकाऱ्यांसह सर्व शाखा कार्यालयांचे अभियंता, मंडल कार्यालयांचे व चाचणी विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी, तसेच विद्युत ठेकेदार या रॅलीत सहभागी झाले होते.

यावेळी अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार म्हणाले, महावितरणच्या २० व्या वर्धापनदिनानिमित्त व विद्युत सुरक्षा सप्ताह निमित्त शहरातील नागरिकांमध्ये विद्युत सुरक्षिततेबाबत जनजागृती व्हावी तसेच महावितरणचे कर्मचारी किती जोखीम घेत देत असलेल्या सेवेची माहिती नागरिकांना व्हावी यासाठी विशेष जनजागृती रॅलीचे व पथनाट्याचे आयोजन केले होते. कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट पथनाट्य सादर करून जनजागृती केली आहे. नागरिकांनी महावितरणला कायम सहकार्य करावे, असे आवाहन केले.

कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण म्हणाले, महावितरणचे कर्मचारी अहोरात्र जीव धोक्यात घालून विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्नशील असतो. आजपर्यंत हजारो कर्मचारी अपघातात मृत्युमुखी पडले आहेत. आपल्या घरात प्रकाश देण्यासाठी जीवाची पर्वा न करता सेवा देणाऱ्या या प्रकाश दुताला सर्वांनी मान सन्मानाची वागणूक द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी शहरात विविध भागांमध्ये पथनाट्य सादर करून जनजागृती केली. पथनाट्यात विद्युत कर्मचारी उन, वारा व पावसातही खंडीत झालेला विद्युत पुरवठा पुन्हा सुरळीत करण्यासाठी किती मोठा धोका पत्करतो याचे हृदयद्रावक नाट्य सादर केले. काम करताना कर्मचाऱ्याचा अपघातात कसा मृत्यू होतो हेही दाखवण्यात आले. पथनाट्य बघण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. हे पथनाट्य राजेंद्र घोरपडे, सूचित मुंडे, राम थोरात व प्रवीण बडे आदी कर्मचाऱ्यांनी सादर केले

# महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या तज्ञ संचालकपदी डॉ. श्रीकांत गांधी आणि रतिलाल गुगळे यांची नियुक्ती



महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या तज्ञ संचालकपदी डॉ. श्रीकांत गांधी आणि रतिलाल गुगळे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

नगर – भिंगार येथील महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या तज्ञ संचालकपदी संस्थेचे ज्येष्ठ संचालक डॉ. श्रीकांत गांधी आणि संस्थापक संचालक रतिलाल गुगळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीनिमित्त संस्थापक चेअरमन नंदकुमार झंवर (मन्नूशेठ), व्हाईस चेअरमन शांतीलाल मुनोत आणि संचालक मारुती पवार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात संस्थेचे संस्थापक चेअरमन नंदकुमार झंवर यांनी उपस्थितांना संबोधित करताना संस्थेच्या तीन दशकामधील वाटचालीचा थोडक्यात आढावा घेतला. त्यांनी सांगितले, महेश नागरी पतसंस्था ही आज जेव्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि विश्वासार्ह संस्था म्हणून ओळखली जाते, ते यामागे संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांची, संचालकांची आणि कर्मचाऱ्यांची कठोर मेहनत आहे. डॉ. गांधी व गुगळे यांची नियुक्ती संस्थेला अधिक व्यावसायिक आणि धोरणात्मक दृष्टिकोन देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संचालक मारुती पवार म्हणाले की, डॉ. श्रीकांत गांधी यांचा वैद्यकीय क्षेत्रातील अनुभव आणि व्यवस्थापन कौशल्य, तसेच रतिलाल गुगळे यांचा सहकार क्षेत्रातील सखोल अभ्यास, संस्थेच्या भविष्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरेल. दोघांचं मार्गदर्शन मिळणं म्हणजे संस्थेसाठी नवी ऊर्जा आणि नवी दिशा ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सत्काराला उत्तर देताना डॉ. श्रीकांत गांधी यांनी संस्थेने दिलेली जबाबदारी मी पूर्ण विश्वासाने आणि प्रामाणिकपणे पार पाडणार आहे. सभासदांच्या हितासाठी आणि संस्थेच्या प्रगतीसाठी कार्यरत राहणे, हे सर्वोच्च ध्येय असणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रतिलाल गुगळे यांनीही

माझं सहकार चळवळीतील कार्य, संस्था उभारणीच्या काळातील अनुभव आणि या क्षेत्रातील कौशल्य वापरून मी संस्थेच्या प्रगतीसाठी कटिबद्ध राहणार असल्याचे सांगितले.

# वेदांती गोंगले हिचे एलएल.एम परिक्षेत यश



नगर – सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांचे मार्फत कायदा क्षेत्रातील घेतलेल्या उच्चतम (एलएल. एम) परीक्षेत नगर येथील कु. वेदांती गोंगले ही पुणे येथील श्री नवलमल फिरोदिया महाविद्यालया मधून नाविन्यपूर्ण (A) ग्रेड मध्ये उत्तीर्ण झाली आहे.

कायदा क्षेत्रामध्ये पी. एच. डी. करण्याचा तिचा मानस आहे. तिच्या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

माजी जिल्हा न्यायाधीश चंद्रचूड द. गोंगले यांची ती मुलगी आहे.

# मंगलदिप मल्टीस्टेटच्या कर्जदारास २ महिने कैद; १,१०,००० रुपये नुकसान भरपाई देण्याची शिक्षा

नगर – अहमदनगर येथील अति. मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने कर्जदार रूख्मीणी सुखदेव जस्वानी, रा. तारकपुर, अहिल्यानगर यास निगोशिएबल इंस्ट्रूमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये दोषी ठरवून २ महिने कैद व १,१०,००० नुकसान भरपाईची शिक्षा ठोठावली आहे. दंडाची रक्कम न भरल्यास ६ महिने कैद भोगण्याची शिक्षा देखील दिलेली आहे. तसेच नुकसान भरपाई रक्कम फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांना देण्याचा आदेश दिलेला आहे. रूख्मीणी सुखदेव जस्वानी यांनी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी, यांचेकडुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपोटी दिलेला धनादेश वटला नाही व नोटीस मिळुनही धनादेशाची रक्कम दिली नाही त्यामुळे संस्थेने रुख्मीणी सुखदेव जस्वानी यांचे विरूद्ध न्यायालयात फिर्याद दाखल केलेली होती. संस्थेतर्फे देण्यात आलेला पुरावा ग्राह्य धरून न्यायालयाने कर्जदार रूख्मीणी सुखदेव जस्वानी यांना वरील प्रमाणे शिक्षा सुनावली आहे. संस्थेच्या वतीने सागर लक्ष्मण फुलारी, भाउसाहेब वाघुले व रामचंद्र पानसरे यांची साक्षी महत्वाची ठरली. फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांचे. करीता ॲड. सुहास एस. टोणे यांनी न्यायालयात बाजु मांडली. त्यांना ॲड. अमित अडागळे व ॲड. विलास ढोणे, ॲड. गौरव हरबा, ॲड. ओम गुंड यांनी सहकार्य केले.

# मंगलदिप मल्टीस्टेटच्या कर्जदारास ५० हजार रुपये दंडाची शिक्षा

नगर – अहमदनगर येथील अति. मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने कर्जदार रूपाली संतोष शेटे, रा. ढवण वस्ती, अहिल्यानगर यास निगोशिएबल इंस्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये दोषी ठरवून ५०,००० रुपय दंडाची शिक्षा ठोठावली आहे. दंडाची रक्कम न भरल्यास १५ दिवस कैद भोगण्याची शिक्षा देखील दिलेली आहे. तसेच नुकसान भरपाई रक्कम फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांना देण्याचा आदेश दिलेला आहे. रूपाली संतोष शेटे यांनी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी, यांचेकडुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपोटी दिलेला धनादेश वटला नाही व नोटीस मिळुनही धनादेशाची रक्कम दिली नाही त्यामुळे संस्थेने रूपाली संतोष शेटे यांचे विरूद्ध न्यायालयात फिर्याद दाखल केलेली होती. संस्थेतर्फे देण्यात आलेला पुरावा ग्राह्य धरून न्यायालयाने कर्जदार रूपाली संतोष शेटे यांना वरील प्रमाणे शिक्षा सुनावली आहे. संस्थेच्या वतीने सागर लक्ष्मण फुलारी, भाउसाहेब वाघुले व रामचंद्र पानसरे यांची साक्षी महत्वाची ठरली.

फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांचे करीता ॲड. सुहास. एस. टोणे यांनी न्यायालयात बाजु मांडली. त्यांना ॲड. अमित अडागळे व ॲड. विलास ढोणे, ॲड. गौरव हरबा, ॲड. ओम गुंड यांनी सहकार्य केले.



जुन्या पिढीतील हिंदू उर्दू साहित्याचे समर्पित प्रसारक डॉ शंकर केशव आडकर यांच्या २० वा स्मृतिदिन हिंदी भाषा समृद्धीच्या विविध संकल्पनांच्या निर्धाराने झाला.

# हिंदी भाषेच्या समृद्धीसाठी डॉ. आडकर यांच्या स्मृतीदिनी संकल्पांचा निर्धार

नगर – हिंदी भाषेमुळे भारताची एकता, अखंडता जपली गेली. डॉ आडकर सरांसारख्या असंख्य समर्पित प्रसारकांच्या त्यागातून हिंदी भाषा समृद्ध झाली. सर्वांचे मने जोडणारी या राष्ट्रभाषेला पर्यायी दुय्यम भाषेत होणारी गणना खेद जनक असल्याची भावना हिंदी भाषेवर प्रेम करणाऱ्या सृजन सभेत व्यक्त करण्यात आली. निमित्त होते जुन्या पिढीतले हिंदी उर्दू अभ्यासक प्रकांड पंडित डॉ शंकर केशव आडकर यांच्या २० स्मृतिदिन सोहळा.

आडकर ट्रस्ट वतीने बालिकाश्रम रोडवरील आडकर संकुलात २० वा स्मृतिदिन सोहळा झाला. त्यावेळी निवृत्त प्राचार्य डॉ. विश्वासराव काळे, सुरेश जैन हे आडकर सरांचे विद्यार्थी, नगर कॉलेजच्या हिंदी विभाग प्रमुख डॉ.ऋचा शर्मा, निवृत्त लष्करी अधिकारी राजीव शर्मा, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक नारायण मंगलारप, श्रीनाथ विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका सौ. अनिता सिद्धम, दिनूभाऊ कुलकर्णी, क्रीडा मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर खेडकर, डॉ. प्रा. सुनील कात्रे आदि याप्रसंगी उपस्थित होते. विविध वक्त्यांनी आपल्या भाषणात शंकर केशव आडकर यांच्या आठवणींना उजाळा देऊन विद्यार्थ्यांशी भावनिक नाते जोडणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाचा गौरव केला.

आडकर चे अध्यक्ष प्रा.गिरीश कुलकर्णी यांनी आडकर संकुलनात दर सोमवारी सर्वांनी हिंदी भाषेत संवाद करून हिंदी भाषा समृद्धीसाठी डॉ. आडकरांना आगळीवेगळी श्रद्धांजली अर्पण करण्याचा संकल्प जाहीर केला.

नगरचे रहिवासी मुंबई येथे स्थायिक साहित्यिक चंद्रकांत भोंजाळ यांच्या पुढाकारातून हिंदी भाषेतील साहित्यिकांचे समृद्ध ग्रंथालय डॉ.आडकर यांच्या नावाने उभारण्याचा निर्धार ज्येष्ठ पत्रकार भूषण देशमुख यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

आडकर ट्रस्टचे सचिव अशोक कुरापाटी यांनी आभार मानले.

# अभ्यासाबरोबरच खेळ हा सुद्धा महत्वाचा आहे

## नरेंद्र फिरोदिया यांचे प्रतिपादन; सीए विद्यार्थी संघटनेद्वारे स्पोर्ट्स कार्निवलचे आयोजन



फूटबॉलमधील विजेत्या व उपविजेत्यांना स्मृतिचिन्ह व पदके देऊन गौरविण्यात आले.

नगर – अभ्यासाबरोबरच खेळ हा सुद्धा महत्वाचा आहे असे प्रतिपादन नरेंद्र फिरोदिया यांनी केले. ते अहमदनगर सीए आणि विद्यार्थी शाखा यांच्या वतीने आयोजित क्रिकेट व फूटबॉल खेळांच्या स्पर्धांच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कोणताही आवडीचा खेळ खेळल्याने शरीर व मन तंदुरुस्त राहते, एकाग्रता वाढून तणाव कमी होण्यास मदत होते, त्यामुळे विद्यार्थी व सीए यांनी अभ्यास व काम करताना प्रत्येकाने किमान एक तास स्वत:च्या आरोग्याकरीता दिला पाहिजे असे आवाहन त्यांनी याप्रसंगी सर्वांना केले.

नगर सीए शाखेचे अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. ते म्हणाले की, काम अथवा अभ्यास करत असताना आपल्या तब्येतीकडे दुर्लक्ष करू नये, म्हणूनच कामाबरोबरच कुठलातरी एक खेळ खेळावा असा या स्पर्धा घेण्यामागचा उद्देश आहे.

यावेळी सीए विद्यार्थी शाखेचे अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया म्हणाले की, नगरला अनेक प्रतिभावंत खेळाडूंची परंपरा आहे. अशा प्रकारच्या स्पर्धेतूनच काही खेळाडू पुढे आले आहेत. या स्पर्धेमध्ये ४५ सीए सभासद तर १३० विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

सीए शाखेचे उपाध्यक्ष व विद्यार्थी शाखेचे अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी सर्व खेळाडुंचे आभार मानले. यावेळी सीए शाखेचे माजी अध्यक्ष सीए मोहन बरमेचा, सीए सुशील जैन, सीए संदीप देसरडा, सीए पवन दरक, सीए ज्ञानेश्वर काळे व सीए सनित मुथ्था उपस्थित होते. या स्पर्धेसाठी विद्यार्थी शाखेचे, ब्राह्मी शिंगवी, अबुजर शेख, वेद सुवर्णपाठकी, तेजस कासवा, राशी कर्नावट, अक्षय कटारिया, ऋषिकेश डफळ, अभिनव कोठारी, तसेच सीए शाखेचे पदाधिकारी सीए महेश तिवारी, सीए महेश भळगट, सीए सुनंदा रच्चा, सीए चांसी अगरवाल यांनी परिश्रम घेतले.

अत्यंत चुरशीने आणि उत्साहात या स्पर्धा पार पडल्या. त्यानंतर लगेचच बक्षीस समारंभ झाला. परितोषिक वितरण वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलचे विकासा चेअरमन सीए जितेंद्र सागलानी यांच्या हस्ते करण्यात आले.

या स्पर्धेमध्ये क्रिकेट मध्ये सीए साहिल भालसिंग, सीए संकेत राठोड, अभिनव कोठारी, स्वयंम डुंगरवाल, यांचा टॅलि लेजेन्डस संघ विजेता ठरला तर अर्पित पितळे, ऋतुज पटवा, आदित्य काळे यांचा ऑडिट ॲव्हेंजर्स उपविजेता संघ ठरला तसेच फूटबॉलमध्ये नमन खंडेलवाल, मिहिर बोरा यांचा बॅलेन्सशीट बॉलर्स संघ विजेता व सीए महेश तिवारी, पार्थ खंडेलवाल, यांचा रेव्हेन्यु राइडर्स उपविजेता संघ ठरला तसेच महिलांमध्ये सीए सुनंदा रच्चा, ब्राह्मी शिंगवी, प्रज्ञा नागपुरे यांचा थाला संघ विजेता ठरला विजेत्यांना व उपविजेत्यांना स्मृतिचिन्ह व पदके देऊन गौरविण्यात आले.

# पैलवानला जात धर्म नसतो, हनुमानजींचे अंश त्यांच्यात असते

## आदिनाथ महाराज शास्त्री यांचे प्रतिपादन; शेवगावला देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन, जिल्ह्यासह राज्यातील २५० पेक्षा अधिक कुस्तीपटूंचा सहभाग

नगर – पैलवान मुलांमध्ये व वस्तादात हनुमानजीचे रुप दिसते. आपल्या संस्कृतीतील कुस्ती खेळाला चालना देण्यासाठी घेण्यात आलेला उपक्रम कौतुकास्पद आहे. अरुण मुंढे हे स्वत: खेळाडू असल्याने त्यांनी खेळाडूंची खरी किंमत करून कुस्ती फड रंगवला. पैलवानला जात धर्म नसतो, हनुमानजींचे अंश त्यांच्यात असते. सातत्याने कुस्ती आखाडा घेण्याचे आदिनाथ महाराज शास्त्री यांनी आवाहन केले.

शेवगाव येथे ४ जून रोजी देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री, ह.भ.प. राम महाराज झिंजुर्के व रेणुका मल्टीस्टेटचे चेअरमन प्रशांत भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले. अहिल्यानगर जिल्हा तालीम संघ, शेवगाव तालुका तालीम संघ आणि वंदे मातरम क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कुस्ती स्पर्धेत नगर जिल्ह्यासह राज्यातील २५० पेक्षा अधिक कुस्तीपटू कुस्ती स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

शेवगावच्या खंडोबा मैदानावर कुस्तीचा थरार रंगला असून, पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी पहिल्याच दिवशी कुस्ती पाहण्यासाठी मोठी गर्दी केली होती. या उद्घाटन सोहळ्यासाठी ज्ञानेश्वर महाराज बटूळे, भाजपचे प्रदेश सरचिटणीस तथा या स्पर्धेचे आयोजक अरुण मुंढे, जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष पै. वैभव लांडगे, खजिनदार पै. नाना डोंगरे, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, जगदीशशेठ धूत, विहीपचे वंजारी सर, नंदू मुंढे, प्रशांत भालेराव, तुषार वैद्य, अमोल सागडे, डॉ. कृष्णा देहाडराय, एकनाथ कुसळकर, अंकुश कुसळकर, मगर कडू, कमलेश गांधी, दिगंबर काथवटे, माजी उपनगराध्यक्ष वजीर पठाण, विक्रम बारवकर, दिपक डावखर, रमेश दारकुंडे, विनोद मोहिते, सालार शेख, माऊली खेडकर, बाळासाहेब कोळगे, एकनाथ शिरसाठ, गणेश गर्जे, उदय मुंढे, सुनील जगताप, क्रीडा अधिकारी भाऊसाहेब वीर, माजी सैनिक विनोद शेळके, पप्पू केदार, अंकुश ढाकणे, सोमा मोहिते, अभी बडे, अंबू पहिलवान, प्रकाश चित्ते आदी उपस्थित होते.



शेवगाव येथे देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री, ह.भ.प. राम महाराज झिंजुर्के व रेणुका मल्टीस्टेटचे चेअरमन प्रशांत भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविकात अरुण मुंढे म्हणाले की, राजकारणात आल्यानंतर खेळाकडे दुर्लक्ष झाले, मात्र खेळाडूवृत्तीचा पिंड सोडला नाही. वंदे मातरम क्रीडा मंडळाच्या माध्यमातून युवकांना व्यायामाची आवड निर्माण होण्यासाठी व त्यांना दिशा देण्यासाठी व्यायामशाळा व कुस्ती संकुल उभारले. त्याचे उद्घाटन सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणात या कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. शेवगावमध्ये पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात कुस्त्याचे नियोजन करण्यात आले असून, या स्पर्धेत एक पंजाब केसरी तर तीन महाराष्ट्र केसरी एकाच आखाड्यात उतरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रारंभी प्रारंभी पहेलगाम येथील दहशतवादी हल्लयात जीव गेलेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. पाहुण्यांचे स्वागत व संत पूजन नंदूभाऊ मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले. पाहुण्यांचा पगडी घालून सन्मान करण्यात आला. आखाडा व बजरंग बलीच्या प्रतिमेचे पूजन करुन उपस्थितांच्या हस्ते कुस्ती लावून या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

प्रशांत भालेराव यांनी स्पर्धेला शुभेच्छा देऊन, शेवगाव तालुक्यात विविध क्रीडा स्पर्धांना प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले.

राम महाराज झिंजुर्के यांनी तरुणांनी शरीर संपदा कमविण्यासाठी व्यायाम केला पाहिजे. कुस्तीने मन व शरीर सदृढ बनते. निरोगी आरोग्यासाठी कुस्ती खेळ खेळण्याचे त्यांनी सांगितले. कुस्तीचे समालोचन हंगेश्वर धायगुडे यांनी केले. पंचप्रमुख रवी बोचरे यांच्या मार्गदर्शनाखाली कुस्त्या पार पाडत आहे.

पहिल्या दिवशी ४२, ४८, ५२, ५५, ६०, ६५, ७४, ८४ किलो आणि ८४ ते १२५ किलो ओपन गटातील कुस्त्यांना प्रारंभ झाले.

# माहेश्वरी युवा संगठनच्या वतीने स्वर आणि भक्तीचा संगम; सिंगिंग, म्युझिकल इन्स्ट्रुमेंट आणि भजन स्पर्धा उत्साहात



माहेश्वरी युवा संगठनच्यावतीने महेश नवमी निमित्त स्वरांची आणि भक्तीमय वातावरणाची अनुभूती देणारी सिंगिंग, म्युझिकल इन्स्ट्रुमेंट व भजन गायन स्पर्धा उत्साहात पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन श्रीगोपाल धूत यांच्या हस्ते करण्यात आले.

नगर – माहेश्वरी युवा संगठनच्या वतीने महेश नवमी निमित्त अहिल्यानगर येथे श्रीनिवास झंवर यांच्या प्रायोजकत्वाखाली स्वरांची आणि भक्तीमय वातावरणाची अनुभूती देणारी सिंगिंग, म्युझिकल इन्स्ट्रुमेंट व भजन गायन स्पर्धा नुकतीच उत्साहात पार पडली. ही स्पर्धा सेठ रामनाथजी धूत ऑडिटोरीयम, श्री रामकृष्ण इंग्लिश मीडियम स्कूल, भवानीनगर, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी श्रीगोपाल धूत, नंदकुमार झंवर, बजरंग दरक, राजेश झंवर, गणेश झंवर, विठ्ठलदास भुतडा, मोहनलाल मानधना, मुकुंद धूत व महेश काबरा उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना श्रीगोपाल धूत म्हणाले, माहेश्वरी युवा संगठनने आयोजित केलेल्या या सांस्कृतिक उपक्रमामुळे युवकांना आपल्या कलागुणांना वाव मिळतो आहे. हे मंच म्हणजे आजच्या तरुणांच्या प्रतिभेला दिशा देण्याचे कार्य करीत आहे. संगीत आणि भजन हे आत्म्याशी नाते सांगणारे माध्यम आहे. अशा प्रकारच्या कार्यक्रमांमुळे समाजामध्ये एकात्मता वाढते. तरुणांमध्ये नेतृत्वगुण विकसित होतात. सर्व आयोजक व सदस्यांनी समर्पणभावाने काम करत या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले, हे विशेष उल्लेखनीय आहे, असे ते म्हणाले.

स्पर्धेत अनेक स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष शाम भुतडा यांच्यासह सदस्य संकेत मानधने, विशाल झंवर, अनिकेत बलदवा, गोविंदा जाखोटिया, सुमित चांडक, प्रतीक सारडा, पियुष झंवर, अभिनंदन कालाणी, ऋषिकेश बजाज, वेदांत बजाज व प्रणव बिहानी यांनी अथक परिश्रम घेतले. सूत्रसंचालन मधुर बिहानी यांनी तर प्रकल्प प्रमुख म्हणून पियुष झंवर व ऋषिकेश बजाज यांनी भुमिका बजावली. स्पर्धेचे परीक्षण कल्पेश अदवंत आणि पूनम इंगळे यांनी केले.

## प्रा. सुनिल धस यांचे आर.एस.पी. अधिकारी प्रशिक्षण पूर्ण



प्रा. सुनिल धस यांचे आर.एस.पी. अधिकारी प्रशिक्षण पूर्ण झाल्याबद्दल त्यांना प्रमाणपत्र देताना जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे.

नगर – येथील प्रा. सुनिल चंद्रशेखर धस यांनी नुकतेच महाराष्ट्र राज्य गृह विभाग, पोलिस व शालेय शिक्षण विभागाच्या अंतर्गत महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा व नागरी संरक्षण (आर.एस.पी.) अधिकारी हे दहा दिवसीय प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले.

शहरातील पोलिस मुख्यालय येथे नुकतेच हे प्रशिक्षण पार पडले. सदर प्रशिक्षण पूर्ण करुन दिलेल्या विशेष योगदानाबद्दल प्रा. धस यांचा जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माध्यमिक शिक्षण अधिकारी अशोक कडूस, पोलिस निरीक्षक उमेश परदेशी, वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, संस्थेचे राज्यस्तरीय अध्यक्ष संजय शेंडे, उपाध्यक्ष पितांबर महाजन, विभागीय समुपदेशक सिकंदर शेख, जिल्हा समुपदेशक सोमनाथ बोंतले, उप जिल्हा समुपदेशक प्रकाश मिंड, कवायत प्रशिक्षक मुसा सय्यद यांनी प्रशिक्षणात मार्गदर्शन केले .

प्रा. धस हे अहमदनगर जिल्हा मराठा संस्थेच्या ज्ञानोदय इंग्लिश स्कूल, नेवासा येथे इंग्रजीचे अध्यापक म्हणून कार्यरत आहेत. या प्रशिक्षणातंर्गत वाहतूक नियंत्रण, नागरी संरक्षण, मैदानी कवायत, अग्निशमन सेवा, प्रथमोपचार, योग, ध्यानधारणा व इतर आकस्मिक सेवा यांचे प्रशिक्षण देण्यात आले.

या अभ्यासक्रमात इयत्ता पाचवी ते दहावी या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिस्त व अनुशासन याचे धडे विशेष तासिका अंतर्गत मिळणार आहेत. प्रा. धस यांनी मिळवलेल्या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य रावसाहेब चौधरी यांनी त्यांचे अभिनंदन केले.





इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने आज पर्यावरण दिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या बॅनरचे अनावरण करण्यात आले.

# आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या बॅनरचे अण्णा हजारे यांच्या हस्ते अनावरण

नगर – इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने पर्यावरण दिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या बॅनरचे अनावरण करण्यात आले. या प्रसंगी उपस्थितांना योग दिनाच्या उपक्रमात सक्रीय सहभागासाठी प्रेरित करण्यात आले.

या वर्षी २१ जून रोजी साजऱ्या होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची थीम एक पृथ्वी, एक स्वास्थ्यासाठी योग अशी असून, इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशन, सूर्या फाउंडेशन आणि आयुष मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने भारतभर विविध ठिकाणी योग साधनेचे मोफत वर्ग आयोजित करण्यात येणार आहेत.

इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशन ही संस्था सध्या २२ देशांमध्ये कार्यरत असून निसर्गोपचार व योगोपचार यांचा प्रसार करण्याचे कार्य करत आहे. या संस्थेमार्फत दरवर्षी २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन तर १८ नोव्हेंबर रोजी निसर्गोपचार दिन देशभर साजरे केले जातात.

या कार्यक्रमासाठी अहिल्यानगर येथून सौ. प्रेरणा नाबरिया, भरत बागरेचा, श्रीनिवास नाबरिया यांच्यासह अहिल्यानगर सायकलिस्ट असोसिएशनचे श्री व सौ. चंद्रशेखर मुळे हेही उपस्थित होते. या मोफत योग उपक्रमांचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. सहभागी होण्यासाठी खालील संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा: सौ. प्रेरणा नाबरिया ९४०३३७८२७९, यश पाटील ८२०८२६५३८२, सौ. प्रमिला आगरवाल ९८२३५०६१२०.

# स्नेह मेळाव्यामुळे जुन्या आठवणींना उजाळा, ३ दशकानंतर विद्यार्थ्यांना एकत्र येण्याचा योग



हिंगणगाव येथील न्यू इंग्लिश स्कूल हिंगणगाव या विद्यालयातील १९९४–९५ मधील इयत्ता दहावीच्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळावा उत्साहात झाला. (छाया – समीर मन्यार)

नगर – पुन्हा शाळेत जावे वर्गात बाकावर बसून गप्पा माराव्यात. मित्र–मैत्रिणींना भेटावे. खोडसळपणा करावा खेळाच्या तासाच्या वेळी कबड्डी, खो–खो, लांब उडी, उंच उडी मैदानावर जाऊन खेळ खेळावेत. शिक्षकांना भेटावे गृहपाठ करून आणला नसेल तर हातावर छडी घ्यावी अंगठे धरावे. गणित इंग्रजी तास असेल तर मनात भीती. शिक्षकांबद्दल मनात असलेला आदरयुक्त धाक अशा जुन्या आठवणींना उजाळा देत हिंगणगाव (ता.नगर) येथील रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल हिंगणगाव मधील १९९४–९५ मधील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांनी ३ दशकानंतर स्नेह मेळाव्याच्या माध्यमातून एकत्र येत विद्यार्थी दशेचा पुन्हा अनुभव घेतला. शिक्षकांचा आदर सन्मान करत सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना कालचा वर्ग आजचा परिवार आपल्यामुळेच उभा आहे हे विद्यार्थ्यांनी शिक्षकांना दाखवून देत स्नेहमेळावा उत्साहात संपन्न केला.

यावेळी विद्यालयाचे माजी आदर्श कलाशिक्षक हबीब मन्यार सर, इसराइल पठाण सर, जाधव सर, प्रभाकर शेवाळे सर, सातपुते सर, नारायण फलके सर, खंडागळे मॅडम, बाबुराव फलके सर, क्लार्क बाबुराव सोनवणे सर, शिपाई लक्ष्मण सोनवणे, मोरे मामा, भिंगारे मामा विद्यालयाचे प्राचार्य जाधव सर आदींसह माजी विद्यार्थी उपस्थित होते.

याप्रसंगी रावसाहेब जरे, आशा लांडगे, विशाल कुलकर्णी या विद्यार्थ्यांनी आपली मनोगत व्यक्त केले.

'अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवून जाती दोन दिवसाची संगत रंगत दोन दिवसाची नाती' याप्रमाणे आपण काही दिवस शिक्षणासाठी एकत्र येतो परंतु शिक्षण पूर्ण झाल्यानंतर जो तो आपापल्या मार्गाने कामधंद्याच्या निमित्ताने निघून जातो परंतु आपण ज्या ठिकाणी शिकलो शिक्षणाचे धडे घेतले यशाच्या शिखरापर्यंत पोहोचलो याची जाण असणे गरजेचे आहे आज आपण सर्व विद्यार्थ्यांनी ही जाण जपत आमच्या सर्व सेवानिवृत्त शिक्षकांचा आदर ठेवत सन्मान केला ही कौतुकाची बाब असल्याचे आदर्श कलाशिक्षक हबीब मण्यार सर, इसराइल पठाण सर तसेच शेवाळे सर यांनी सांगितले

स्नेह मेळाव्याचे संयोजन मनोज सोनवणे, संतोष बाबुराव सोनवणे, अतुल पाडळे, संगीता झावरे, संतोष कचरू सोनवणे आदींसह माजी विद्यार्थ्यांनी केले होते.

३० वर्षानंतर विद्यालयात आल्यावर मित्रांच्या भेटी गाठी झाल्यानंतर मागे वळून पाहता अनेकांचे जुन्या आठवणीने डोळे पाणवले होते. तर काहींच्या ओठावर हसु ही आले होते. यावेळी दिवंगत शिक्षक व दिवंगत सहकारी मित्रांना श्रद्धांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी माजी विद्यार्थ्यांकडून विद्यालयास आठ सिलिंग फॅन देण्यात आले तसेच अजून भरघोस मदत देणार हा शब्द दिला त्याबद्दल विद्यालयाचे प्राचार्य जाधव सर यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांचे आभार मानले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व प्रार्थनेने झाली.

प्रास्ताविक रामदास पानसरे यांनी केले. सूत्रसंचालन संतोष भिमराज सोनवणे, अर्चना ठाणगे यांनी केले. चंद्रकांत कोल्हे यांनी आभार मानले.





**अभिनेता करण मेहरा यांच्या हस्ते डॉ. दीपक हरके ग्लोबल अवॉर्ड २०२५ ने सन्मानित**

गोवा येथील फर्न हॉटेलमध्ये ग्लोबल बुक ऑफ एक्सलेन्स, इंग्लंडच्या वतीने देशातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा लोबल अॅवॉर्ड २०२५ ने गौरव करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यामध्ये जगभरात १४३ देशात ८५०० हून अधिक सेवाकेंद्राच्या माध्यमातून निशुल्क ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांचा जगभरात भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रचार व प्रसार केल्याबद्दल सर्वात जास्त काळ चालणाऱ्या भारतीय टेलिव्हिजन मालिकांपैकी एक तो ये रिश्ता क्या कहलाता है मधील मुख्य नायक सिंघानिया म्हणून त्याच्या अभिनयासाठी ओळखला जाणारा अभिनेता, मॉडेल आणि फॅशन डिझायनर करण मेहरा यांच्या हस्ते ग्लोबल अवॉर्ड २०२५ ने सन्मान करण्यात आला. यावेळी ओम शांती मीडियाचे संपादक बी के डॉ. गंगाधर व प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या गोवा सेवाकेंद्राच्या संचालीका बी के वनिता उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर अहमदनगर पैकी मौजे भिस्तबाग भागातील लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील भिस्तबाग येथील जमिन गट. नं. २२/४ याचे क्षेत्र ० हे २७ आर याचा आकार ०रु.२५ पैसे यांसी चतुःसिमा : पुर्व गट नंबर २२/५, पश्चिम– गट नंबर २२/३, दक्षिण– गट नंबर २२/४ पैकी व उत्तर– गट नंबर २२/४ पैकी अशी एकत्रीत १. नाना येशू तागड, २. सिताराम येशू तागड, ३. मोहन येशू तागड यांचे मालकीची असून त्यांनी आमचे अशिलांस सदरची मिळकत कायमखुष खरेदीने देण्याचे ठरवून, साठेखत करुन दिलेले आहे. सदरची मिळकत ही बिनशेती करुन त्याचे प्लॉट पाडून आमचे अशिलांस देण्याची जबाबदारी लिहून देणार विद्यमान मालकाची होती व त्याप्रमाणे नुकतीच सदर मिळकत ही वरील विद्यमान मालकांनी बिनशेती करून, त्याचे प्लॉट पाडून अंतिम मंजुरी मिळवली असल्याचे आमचे अशिलांस खात्रीलायक समजते व त्याप्रमाणे आमचे अशिलांस संपूर्ण क्षेत्राचे खरेदीखत करून देण्याची जबाबदारी विद्यमान मालकांची असतांना ते तसे करुन देत नसल्याने त्यांना आमचे अशिलांनी वकीलामार्फत नोटीस पाठविली असता त्यांनी आमचे अशिलांची भेट घेवून २० मे २०२५ पर्यंत व्यवहार पुर्ण करण्याची जबाबदारी स्विकारली होती, तथापी त्यांनी तसे न करता सदर जमिन मालक हे सदर मिळकतीमध्ये असलेले प्लॉट त्रयस्तांस हस्तांतर करण्याचे प्रयत्नात असल्याचे समजते.

सबब सदर जाहीर नोटीसीने तमाम लोकांना कळविण्यात येते की वर नमुद मिळकतीबाबत वर नमुद मिळकतीचे मालकांबरोबर कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी, विक्री, गहाण, दान, करार, साठेखत अगर अन्य हस्तांतराचा व्यवहार करु नये, आमचे अशिल हे सदरचे विद्यमान मालक हे कराराचा भंग करु पहात असल्याने कोर्टामध्ये सदर साठेखतावरुन खरेदीखत करून मिळणेसाठी कोर्ट कारवाई करीत असून, यदाकदाचित कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार मिळकतीचे विद्यमान मालकाबरोबर केल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिलांवर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही आणि मिळकत खरेदी घेणारास मिळकतीचा कोणताही ताबा मिळणार नाही, कोणतेही हक्क, अधिकार प्राप्त होणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून सदर जाहीर नोटीस दिली असे.

**ॲड. स्वप्निल एस. बिहाणी**
बी.एस.एल.एल.एल.बी.
५. रामकमल बंगला, विराज इस्टेट
तारकपुर, बस स्टॅण्ड समोर, अहमदनगर
मो. ९२८४१७०८१४.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर ठरलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द **झालेपासून ७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. ०५/०६/२०२५**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

**मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगर पैकी, **अहिल्यानगर महानगरपालिका** हद्दीतील **मौजे केडगांव** येथील **सर्व्हे नंबर ४७६/४७८/४७९/४८६/४८७/४८९/४९७ मधील** खालील वर्णनाची प्लॉट मिळकत–

| प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मी. | यांसी चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| २११ | १८७.८० | ओपन स्पेस | प्लॉट नंबर २१० | ९.०० मी. रस्ता | प्लॉट नंबर २१२ |
| २१२ | १८७.८० | ओपन स्पेस | प्लॉट नंबर २११ | ९.०० मी. रस्ता | प्लॉट नंबर २१३ |
| २१३ | १८७.८० | ओपन स्पेस | प्लॉट नंबर २१२ | ९.०० मी. रस्ता | प्लॉट नंबर २१४ |
| २१४ | १८७.८० | ओपन स्पेस | प्लॉट नंबर २१३ | ९.०० मी. रस्ता | प्लॉट नंबर २१५ |
| २१५ | १८७.८० | ओपन स्पेस | प्लॉट नंबर २१४ | ९.०० मी. रस्ता | प्लॉट नंबर २१६ |
| २१६ | १८७.८० | ओपन स्पेस | प्लॉट नंबर २१५ | ९.०० मी. रस्ता | प्लॉट नंबर २१७ |
| २१७ | ३३०.३० | प्लॉट नंबर २२८ | प्लॉट नंबर २१६ | ९.०० मी. रस्ता | १२.०० मी. रस्ता |

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक–**
**श्री. हर्षल संतोष भंडारी**
रा. गावठाण, टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर,
जि. अहिल्यानगर ४१४३०४.

**ॲड.आर.टी.शर्मा**
**ॲड. गणेश एम. शर्मा**
**ॲड. अंकिता अनिल शर्मा (जैन)**
फोन नं. २३४११०६, मो.नं. ९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४,१७, पहिला मजला श्री आनंद कॉम्प्लेक्स,
दाळमंडई, अहिल्यानगर

## महाराष्ट्र शासन
## रो.ह.यो. (कार्य). विभाग अहिल्यानगर

पत्ता :– बांधकाम भवन, नगर– औरंगाबाद रोड, अहिल्यानगर
ई–मेल पत्ता :– egsahmednagar.cc@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक ०२४१–२४२२९३८

## ई–निविदा सुचना क्रं. ०३ सन २०२५–२०२६

कार्यकारी अभियंता रो.ह.यो. (कार्य). विभाग अहिल्यानगर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून खाली नमूद केलेल्या कामासाठी निविदेतील अटी व शर्ती यांची पुर्तता करतील असे सक्षम कंत्राटदार तसेच आंतरराष्ट्रीय कंत्राटदार यांची उप कंपनी भारतीय असल्यास निविदेमध्ये भाग घेवू शकेल. खालील कामांकरिता ब–१ नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता रो.ह.यो. (कार्य). विभाग अहिल्यानगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत (रु. लाखात) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|
| १ | अ) राहुरी नगर परिषद हद्दीतील एस आर हॉटेल ते रवींद्र घाडगे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. ता. राहुरी. ब) राहुरी नगर परिषद हद्दीतील शुक्लेश्वर चौक ते कानिफनाथ चौक रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. ता. राहुरी. क) राहुरी नगर परिषद हद्दीतील नवी पेठ येथील नवीन शॉपिंग कॉम्प्लेक्स समोरील रस्ता डांबरीकरण करणे. ता. राहुरी. ड) राहुरी नगर परिषद हद्दीतील नगर मनमाड हायवे ते शुक्लेश्वर चौक रस्ता डांबरीकरण करणे. ता. राहुरी. ई) राहुरी नगर परिषद हद्दीतील संत महिपती महाराज चौक ते श्री. भुजाडी घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. ता. राहुरी | ८६.३१ | वर्ग IV – अ व त्यावरील |

| | | |
|---|---|---|
| ई–निविदा उपलब्ध कालावधी | :– | दिनांक : ०६/०६/२०२५ ते दिनांक १३/०६/२०२५ |
| निविदापूर्व बैठक | :– | निरंक |
| ई–निविदा उघडणे | :– | दिनांक : १६/०६/२०२५ |

खालील संकेतस्थळावर ई–निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
1.www.mahapwd.com
2. Mahatenders.gov.in
(सदर निविदे सूचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता रो.ह.यो. (कार्य). विभाग अहिल्यानगर कार्यालयातील सूचना फलक

जा.क्र. लेखा/निविदा/ २३१०/ सन २०२५
कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय, रो.ह.यो.(कार्य). विभाग,
अहिल्यानगर दिनांक : ०३/०६/२०२५

**कार्यकारी अभियंता,**
रो.ह.यो. (कार्य) विभाग,
अहिल्यानगर



ईद–उल–अजहा निमित्त बंदी असलेल्या प्राण्यांना कुर्बानीपासून टाळण्याची ऑल इंडिया उलेमा बोर्डने सूचना केली.

# बंदी असलेल्या प्राण्यांना कुर्बानीपासून टाळा

## ईद–उल–अजहा निमित्त ऑल इंडिया उलेमा बोर्डची सूचना

नगर – ईद–उल–अजहा निमित महाराष्ट्रातील परभणी जिल्ह्यात ऑल इंडिया उलेमा बोर्डची बैठक आयोजित करण्यात आली होती. यात राज्यातील कायद्यांनुसार कुर्बानीसाठी योग्य व अयोग्य प्राण्यांबाबत सविस्तर चर्चा झाली.

यावेळी ऑल इंडिया उलेमा बोर्ड नॅशनल जनरल सेक्रेटरी अंज़र अन्वर खान, महाराष्ट्र स्टेट सेक्रेटरी मौलाना जहिर अब्बास कासमी, जिल्हा अध्यक्ष परभणी मौलाना शेख जहांगीर नदवी, नांदेड़ ज़िल्हा अध्यक्ष मुफ्ती शफीउद्दीन साहब, जालना ज़िला अध्यक्ष हाफिज हारून पठाण, विधी तज्ञ ॲड. इम्तियाज अहमद खान, जाफर खान, मूसा खान, हाफिज आरिफ गुजराती, मुफ्ती कमर कासमी, मुफ्ती आसिफ अलहाशमी, हाफिज अनीस रहमान अज़ीझी, मुहिब उर्दू, मुहम्मद अब्दुल बाकी, मौलाना अब्दुलकुद्दूस मिली, अर्शद खान, मुफ्ती शेख आलमगीर, हाफिज मुश्ताक फरकानी, हाफिज शेख आलमगीर, हाफिज रिझवान, हाफिज शुऐब, हाफिज अब्दुलहक, मौलाना रईस अहमद, मुहम्मद शुऐब आदीसह अनेक इमाम व उलेमा उपस्थित होते.

यावेळी उलेमांनी यावर भर दिला की, महाराष्ट्रात ज्या प्राण्यांची कुर्बानी कायदेशीरदृष्ट्या पूर्णपणे बंदी आहे, अशा प्राण्यांची कुर्बानी ही कायद्याचे उल्लंघन मानली जाईल व ज्यामुळे केवळ व्यक्तीच नव्हे तर संपूर्ण कुटुंबही कायदेशीर कारवाईच्या कचाट्यात अडकू शकते. त्यामुळे जनतेने अशाच प्राण्यांची कुर्बानी करावी, ज्यावर शासनाकडून कोणतीही बंदी नाही जसे की, बकरा, बकरी, मेंढा, मेंढी व म्हैस इत्यादीची कुर्बानी करण्यात यावी व उपस्थितांनी सर्वांना आवाहन केले की, ईद–उल–अजहा साजरी करताना राज्यातील कायद्याच्या चौकटीत राहूनच साजरी करावी व बंदी असलेल्या जनावरांना टाळावे, असे आवाहन ऑल इंडिया उलेमा बोर्डच्या वतीने करण्यात आले.

घ.नं. 310/भिंगार/2025-26
छावनी परिषद कार्यालय, अहमदनगर
दिनांक– 17/04/2025

## जाहीर नोटीस

या नोटीशीद्वारे जाहीर करण्यात येते की, श्री. निलेश बाळासाहेब रासकर, वय–38 वर्षे, धंदा–व्यवसाय, राहणार माळगल्ली भिंगार, अहिल्यानगर यांनी घर नं. 310, सर्व्हे नं. 211-473, भिंगार अहमदनगर छावनी परिषद हे रजिस्टर बक्षीसपत्र क्र. 367/2025 दिनांक 16/01/2025 च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रीतसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत.

सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण, दान, बक्षीस, खरेदी हक्क हितसंबंध असेल, वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून 30 (तीस) दिवसांचे आत सबळ कागदपत्रांचे पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी, छावणी परिषद, अहमदनगर यांचेकडे तसे लेखी कळवावे.

सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीवर विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

घ.नं. 310, भिंगार
क्षेत्रफळ 96.00 चौ.फूट

कार्यालय अधिक्षक,
कृते मुख्य अधिशासी अधिकारी,
अहमदनगर छावणी परिषद
**(विक्रांत मोरे)**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेला प्लॉट व त्यावरील बांधकामासह मिळकत विद्यमान मालक **तौफिक अन्वर पठाण रा. ब्लॉक नं. ३१/११, मुकुंदनगर, अहमदनगर.** यांचे मालकी वहिवाटीची आहे. सदर मिळकतीचे विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले आहे. तसेच सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्या बाबत आमचे अशिलास विश्वास व भरोसा दिलेला आहे.

परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणतेही चालु वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाई हुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी राईटस अन्य वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट व त्यावरील बांधकामासह मिळकतीचे खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे **भिंगार** येथील प्लॉट व त्यावरील बांधकामासह रो–हाऊस मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| स. नं. | प्लॉट नं. | चौ. मी. |
|---|---|---|
| ३२१/४अ | ३१ | ४३.६८ |

संगणिकृत ७/१२ उताऱ्याप्रमाणे स.नं. ३२१/४अ/प्लॉट ३१/रो हौ ब्लॉक /३१/११

सदर प्लॉटवर मंजुर प्लॅन प्रमाणे बांधकाम झालेल्या गजानन रो–हाऊस स्किम (विर्सजीत) मधील रो–ब्लॉक नं. ३१/११ याचे प्लॉटचे क्षेत्र ४३.६८ चौ. मी. असुन सदर प्लॉटवर लोडबेअरींगमध्ये बांधकाम झालेले असुन बांधकाम क्षेत्र १८.५८ चौ. मी. मिळकतीबाबत.

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस – रस्ता दक्षिणेस – ब्लॉक नं. ३१/१०
पश्चिमेस – बोळ उत्तरेस – ब्लॉक नं. ३१/१२

दि. ०५/०६/२०२५
अहमदनगर.

**ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८

# अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत ३ हजार २८७ लाभार्थ्यांना २७ कोटी ९६ लाखांचे वितरण

## युवकांना सक्षम बनविणारी वैयक्तिक कर्ज व गट कर्ज व्याज परतावा योजना

नगर – अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ योजनेंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ८ हजार ४०२ लाभार्थ्यांना पूर्वसंमती देण्यात आली. त्यापैकी ३ हजार २८७ लाभार्थ्यांची प्रकरणे बँकेने मंजुरी केली आहेत. या लाभार्थ्यांना २७ कोटी ९६ लक्ष ६६ हजार रुपयांचे कर्ज बँकेमार्फत मंजूर करण्यात आले आहे. या कर्जापोटी लाभार्थ्यांना कर्ज प्रकरणांचा व्याज परतावाही महामंडळामार्फत देण्यात आला आहे, अशी माहिती अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक अमोल बोठे यांनी दिली.

आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या घटकातील, प्रामुख्याने मराठा प्रवर्ग आणि ज्या प्रवर्गासाठी स्वतंत्र महामंडळ अस्तित्त्वात नाही, अशा प्रवर्गातील बेरोजगार युवक-युवतींच्या उद्योग व्यवसायाला हातभार लावून त्यांना सक्षम बनविण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत व्याज परतावा योजना राबविल्या जातात. वैयक्तिक कर्ज व्याज परतावा आणि गट कर्ज व्याज परतावा अशा दोन वेगवेगळ्या योजनांचा यामध्ये समावेश आहे. या दोन्ही योजनांची अंमलबजावणी https://udyog.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाच्या माध्यमातून लोकाभिमुख आणि पारदर्शकपणे होत आहे.

**वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (आयआर-१)** – अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेची १० लाख रुपयांवरून १५ लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. लाभार्थ्यांनी व्यावसायिक अथवा उद्योगासाठी बँकेकडून घेतलेल्या कर्जावर या योजनेंतर्गत ४.५ लाख रुपयेपर्यंत व्याज परतावा करण्यात येतो. व्याज परताव्याचा कालावधी ७ वर्षांपर्यंत व व्याजाचा दर दसादशे १२ टक्केपर्यंत आहे.

**गट कर्ज व्याज परतावा योजना (आयआर-२)** – गट कर्ज व्याज परतावा योजनेत किमान दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्तींच्या गटाने एकत्र येऊन व्यवसाय, उद्योगासाठी कर्ज घेतले असल्यास ५० लाख रुपयापर्यंतच्या कर्जावर १२ टक्के दराने व्याज किंवा १५ लाखाच्या मर्यादेत व्याज परतावा दिला जातो. दोन व्यक्तींसाठी २५ लाख, तीन व्यक्तींसाठी ३५ लाख, चार व्यक्तींसाठी ४५ लाख आणि पाच व पाचपेक्षा जास्त व्यक्ती असल्यास ५० लाखपर्यंतच्या व्यवसाय, उद्योग कर्जासाठी या योजनेचा लाभ दिला जातो. या योजनेमध्ये शेतकरी उत्पादक कंपनी गटाने त्यांच्या शेतीपूरक व्यवसायासाठी बँकेमार्फत घेतलेल्या कर्जासाठीही व्याज परतावा दिला जातो.

**व्याज परतावा योजना लाभाच्या अटी** – उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असणे अनिवार्य असून या योजना प्रामुख्याने मराठा प्रवर्गासाठी, तसेच ज्या प्रवर्गाकरीता स्वतंत्र महामंडळ अस्तित्त्वात नाही, अशा प्रवर्गासाठी आहे. लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांच्या आत असणे आवश्यक आहे. त्याबाबत तहसीलदार यांचे प्रमाणपत्र किंवा पती-पत्नी यांचे आयकर परतावा प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्रात स्थायिक, कार्यरत असलेल्या बँकेकडून कर्ज घेणे अनिवार्य आहे.

गट कर्ज व्याज परतावा योजनेमध्ये कमाल वयोमर्यादेचे बंधन राहणार नाही. तसेच गट कर्ज व्याज परतावा योजनेत भागीदारी संस्था, सहकारी संस्था, बचत गट, एल.एल.पी., कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत संस्था व इतर शासन नोंदणीकृत गट, संस्था लाभास पात्र असतील. महामंडळाच्या योजनांतर्गत फक्त व्यवसाय/ उद्योगाकरीता घेतलेल्या कर्जावरील व्याज परतावा करण्यात येतो.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या व्याज परतावा योजनांचा लाभ घेण्यासाठी सर्वप्रथम 'एलओआय' म्हणजेच पात्रता प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. या प्रमाणपत्रासाठी आधारकार्ड (अपडेटेड मोबाईल क्रमांक व स्वत:च्या ई-मेल आयडीसह), रहिवासी दाखला, वीज देयक, शिधापत्रिका, गॅस देयक, बँक पासबुक यापैकी एक रहिवासी पुरावा, उत्पन्नाचा दाखला किंवा आयकर परतावा प्रमाणपत्र (विवाहित असल्यास पती-पत्नी यांचा व अविवाहित असल्यास स्वतःचे आयकर परतावा प्रमाणपत्र), जातीचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला आणि एक पानी प्रकल्प अहवाल सादर करणे आवश्यक आहे. या अहवालाचा नमुना अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या https://udyog.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

पात्रता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यासमवेत लाभार्थ्यांने त्याला करावयाचा असलेल्या व्यवसायाचा, उद्योगाचा प्रकल्प अहवाल (आवश्यक ते सर्व कागदपत्र) घेऊन त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही बँकेमध्ये कर्ज प्रकरण दाखल करावे. बँकेने कर्ज मंजुर केल्यानंतर कर्ज मंजूरीबाबतची आवश्यक सर्व माहिती संबंधिताने वेबप्रणालीवर सादर करावी. यामध्ये ज्या खात्यामध्ये व्याज परतावा हवा आहे त्याचा तपशील, बँक कर्ज मंजुरी पत्र, बँकेमार्फत वितरीत करण्यात आलेल्या कर्जाचा पुरावा (बँक स्टेटमेंट), बँक ईएमआय वेळापत्रक (त्यावर वसुलीचा दिनांक असणे अनिवार्य), प्रकल्प अहवाल, हफ्ता भरल्याबाबतचा पुरावा आदी बाबींचा समावेश असावा.

योजनेच्या लाभासाठी लाभार्थ्यांनी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ कार्यालय, प्रशासकीय इमारत, सावेडी, अहिल्यानगर येथे संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# तणावमुक्त जीवनासाठी आनंद अनुभूती शिबीर

## योग, प्राणायाम, सुदर्शन क्रियेतून तणावमुक्ततेचा मंत्र, ग्रामस्थांचा सहभाग



निमगाव वाघात आनंद अनुभूती शिबिर उत्साहात पार पडले.

नगर – तणावमुक्त आणि आनंदी जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या मानसिक व शारीरिक तंदुरुस्तीचा आनंद अनुभूती शिबिराद्वारे अनुभव निमगाव वाघा ग्रामस्थांनी घेतला. नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे द आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेच्या वतीने, तसेच स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या सहकार्याने पाच दिवसीय प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडले.

गावातील बिरोबा मंदिराच्या सभा मंडपात पार पडलेल्या या शिबिरात आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक रामचंद्र लोखंडे व विशाल गावडे यांनी योग, प्राणायाम, सुदर्शन क्रिया आणि ध्यान याविषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. आधुनिक जीवनशैलीत वाढणाऱ्या ताण-तणावावर नियंत्रण मिळवण्यासाठी साधकांना उपयुक्त अशा तंत्रांचे प्रशिक्षण देण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन डोंगरे संस्थेचे अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते करण्यात आले. समारोपप्रसंगी त्यांनी शिबिरात मार्गदर्शन करणाऱ्या प्रशिक्षकांचा सत्कार केला. कार्यक्रमास सौरभ कापसे, सतीश जाधव, दिलीप फलके, रावसाहेब जाधव, डॉ. संदीप जाधव, सुरेखा जाधव, नामदेव भुसारे, बाबा डोंगरे, मयुर काळे, मंदा डोंगरे, मंगल गावडे आदी उपस्थित होते.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत मानसिक तणाव हे एक मोठे आव्हान बनले आहे. अशा स्थितीत आनंद अनुभूतीसारखे शिबिर मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. हे शिबिर म्हणजे एक आनंदी जीवनाचा प्रवास आहे. समाजाला तणावमुक्त व सकारात्मक जीवनशैलीकडे नेणे हीच खरी सेवा आहे. गावकरी बांधवांनी दिलेला प्रतिसाद पाहता यापुढेही असे उपक्रम नियमित राबविण्याचा आमचा त्यांनी व्यक्त केला.

प्रशिक्षक रामचंद्र लोखंडे म्हणाले की, आनंद अनुभूती हे शिबिर म्हणजे आत्मशोधाचा प्रवास आहे. योग, प्राणायाम व ध्यानाच्या माध्यमातून मनःशांती आणि आनंद मिळतो. शिबिरात सहभागी झालेल्या ग्रामस्थांचा उत्साह आणि शिस्त पाहता विशेष आनंद झाला. सततच्या सरावातून मानसिक आरोग्य सुधारू शकते व शरीरात नवचैतन्य निर्माण होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# दहावी आणि बारावीच्या परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी मानसशास्त्रीय कसोट्या उपलब्ध

नगर – इयत्ता दहावी व बारावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर येथे मानसशास्त्रीय कसोट्या उपलब्ध करुन देण्यात आल्या असून आतापर्यंत १९० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला आहे.

विद्यार्थ्यांच्या बौद्धीक क्षमता, अभिरुची, व्यक्तीमत्व आणि करिअर निवडीसाठी योग्य मार्गदर्शन करणे हा या कसोट्यांचा मुख्य उद्देश आहे. ही सेवा नि:शुल्क असून विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी ०२४५२-२२१०६६ या दूरध्वनी क्रमांकावर, dietahmednagarmaa.ac.in या ईमेल पत्त्यावर संपर्क साधावा अथवा https://dietahilyanagar.in या संकेतस्थळास भेट द्यावी, असेही कळविण्यात आले आहे.

# हॉटेलसमोर लावलेल्या मोटारसायकलची चोरी

नगर – हॉटेलसमोर रस्त्याच्या कडेला लावलेली हिरो कंपनीची स्प्लेंडर प्रो. मोटारसायकल (क्र. एम एच १६ बी एल ९८८३) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. ही घटना माळीवाडा येथील हॉटेल दिपक समोर २८ मे रोजी दुपारी घडली.

या बाबत प्रल्हाद किसन म्हस्के (३५,रा. टाकळी काझी, ता. नगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस ३०५ (ब) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अर्बन बँक कर्ज घोटाळा प्रकरणी एका कर्जदारास पुण्यात पकडले

नगर – नगर अर्बन मल्टीस्टेट बँकेच्या सुमारे २९१ कोटी रूपयांच्या कर्ज घोटाळा प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने कारवाई करत पुण्यातील बांधकाम व्यावसायिकाला ४ जून रोजी अटक केली. रूपेश सूर्यकांत भन्साळी (वय ४९, रा. स्वारगेट, पुणे) असे त्या बांधकाम व्यावसायिकाचे नाव असून, ही अटक पुण्यातील बांधकाम व्यावसायिक शैलेश अग्रवाल याच्यासह इतर आठ जणांनी बँकेतून घेतलेल्या १० कोटी रूपयांच्या कर्ज प्रकरणाशी संबंधित आहे. या संशयितांनी कर्ज बांधकाम व्यवसायासाठी घेतले असतानाही ते इतरत्र वापरण्यात आल्याचे तपासात उघड झाले आहे.

कर्जाची परतफेड न करता, त्याचा गैरवापर केल्याचे समोर आले. अग्रवाल व त्याच्या भागीदारांचा आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांकडून शोध सुरू होता. पोलीस उपअधीक्षक गणेश उगले यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने पुण्यात धाड टाकून भन्साळी याला बुधवारी ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीनंतर त्याला अटक करण्यात आली आहे.

नगर अर्बन मल्टीस्टेट बँकेतील कर्ज घोटाळा गेल्या काही महिन्यांपासून गाजत असून, यापूर्वी अनेक संचालक, कर्जदारांना अटक करण्यात आली आहे. सुमारे २९१ कोटी रूपयांचे कर्ज विविध प्रकारे मंजूर करून त्याचा गैरवापर केल्याचा ठपका संबंधितांवर ठेवण्यात आला आहे. या प्रकरणात आणखीही अनेकांची चौकशी सुरू असून, इतर संशयित आरोपींचा शोध घेण्यासाठी आर्थिक गुन्हे शाखेचे पथक कामाला लागले आहे. भन्साळीच्या अटकेनंतर इतर भागीदारांचा शोध घेतला जात आहे.

# पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवड व संवर्धन आवश्यक

## आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांचे प्रतिपादन; पर्यावरण दिनाच्या निमित्ताने महानगरपालिकेमार्फत भिस्तबाग महाल परिसरात वृक्ष लागवड



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने शहरात वृक्ष लागवड करण्यात आली. भिस्तबाग महल परिसरात या वृक्ष लागवडीचा शुभारंभ झाला.

नगर – वृक्ष लागवड ही पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आवश्यक आहे. झाडे हवेतील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि ऑक्सिजन सोडतात. ज्यामुळे हवा शुद्ध होते आणि तापमान कमी होते. तसेच, झाडे मातीची धूप रोखतात, पाऊस नियंत्रित करतात, आणि पशू, पक्षी, वन्यजीवनासाठी निवारा उपलब्ध करतात. झाडे आपल्या जीवनाला आवश्यक असलेल्या अनेक गोष्टी पुरवतात आणि पर्यावरणाचे संतुलन राखतात. त्यामुळे, आपल्याला जास्तीत जास्त झाडे लावून त्याचे संवर्धन करणे, तसेच पर्यावरणाचे रक्षण करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने शहरात वृक्ष लागवड करण्यात आली. भिस्तबाग महल परिसरात या वृक्ष लागवडीचा शुभारंभ झाला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष व माजी नगरसेवक संपत बारस्कर, सागर बोरुडे, प्रभागातील नागरिक उपस्थित होते. महानगरपालिकेच्या वतीने देशी वृक्षांची लागवड करण्यात आली.

संपत बारस्कर म्हणाले की, झाडे मानवासाठी आवश्यक असलेल्या ऑक्सिजनचा पुरवठा करतात आणि ताण कमी करतात. झाडे आपल्या आजूबाजूला शांतता आणि सौंदर्य निर्माण करतात, ज्यामुळे मानसिक आरोग्य सुधारते. त्यामुळे संपूर्ण शहरात वृक्ष लागवड चळवळ निर्माण होणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या वृक्ष लागवडीच्या मोहिमेत नागरिकांनीही सहभागी व्हावे, असे ते म्हणाले.

दरम्यान, पर्यावरण दिनाच्या निमित्ताने गुरुवार, ५ जूनपासून शहरातील झाडांवर लावलेल्या जाहिराती काढणे, फांद्यांमध्ये अडकलेला नायलॉन मांजा काढण्याची मोहीम महानगरपालिकेमार्फत सुरू करण्यात आली आहे. शहरातील अनेक झाडांवर खिळे ठोकून पोस्टर, बॅनर लावून जाहिराती केल्या जात आहेत. पर्यावरण दिनाच्या निमित्ताने या जाहिराती हरवणे, झाडांमध्ये अडकलेला नायलॉन मांजा काढणे, झाडाभोवती असलेले जुने व खराब झालेले, तुटफूट झालेले ट्री गार्ड काढून घेणे आदी कामे या मोहिमेत करण्यात येत असल्याचे उपायुक्त संतोष टेंगले यांनी सांगितले.



# शहरात साचलेले कचऱ्याचे ढीग हटेनात...

शहरातील कचरा संकलनाचे काम वारंवार विस्कळीत होत असून ठिकठिकाणी साचलेले कचऱ्याचे ढीग उचलले जात नसल्याने नागरिकांना त्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सर्जेपुरा परिसरात तर अनेक व्यावसायिकांच्या गाळ्यासमोरच कचऱ्याचा मोठा ढीग साचल्याने त्यांना दुकानात जायला रस्ता राहिला नसल्याचे या छायाचित्रात दिसत आहे.

# ऑफिस समोर लावलेल्या मोटारसायकलची चोरी; गुन्हा दाखल

नगर – ऑफिस समोर रस्त्याच्या कडेला लावलेली बजाज कंपनीची डिस्कव्हर मोटारसायकल (क्र. एम एच १६ व्ही डी २४४२) कोणीतरी अज्ञात चोरट्यानी चोरुन नेल्याची घटना सावेडी परिसरातील कुष्ठधाम रोडवर ३० मे दुपारी ४ ते १ जून रोजीचे रात्री ११.३० वाजल्याच्या दरम्यान घडली.

या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात प्रशांत व्यंकटेश येमुल (वय ३४, रा. पाईपलाईन रोड, सावेडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला. अधिक तपास पोलीस हवालदार योगेश चव्हाण हे करीत आहेत.

# हिवरेबाजारचे पर्यावरण संवर्धनाचे कार्य दीपस्तंभासारखे : जि.प. सीईओ आनंद भंडारी

## देशी वृक्ष लागवड उपक्रमास सुरुवात

नगर – हिवरेबाजार येथे पद्मश्री पोपटराव पवार यांच्या नेतृत्वाखाली १९८९ पासून १० लाख वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचे मौल्यवान कार्य केले गेले आहे. आज जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पुन्हा एकदा वृक्षलागवड करून पर्यावरण रक्षणाच्या दिशेने दीपस्तंभ उभारला आहे, असे उद्गार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले अहिल्यानगर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी काढले.

हिवरेबाजार येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त गुरुवारी 'एक वृक्ष आईसाठी, एक वृक्ष देशासाठी' या संकल्पनेतून मातृस्मृती वनमंदिर परिसरात वृक्षलागवड उपक्रमास सुरुवात करण्यात आली. या उपक्रमाचा शुभारंभ संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७२५ व्या संजीवन समाधी सोहळा, जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या वैकुंठगमन सोहळा, तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीचे औचित्य साधून करण्यात आला. यावेळी एकूण १४०० देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. ५ जून ते ५ जुलै या कालावधीत वृक्षारोपणाची मालिका राबविण्यात येणार आहे.



हिवरेबाजार येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त गुरुवारी 'एक वृक्ष आईसाठी, एक वृक्ष देशासाठी' या संकल्पनेतून मातृस्मृती वनमंदिर परिसरात वृक्षलागवड उपक्रमास सुरुवात करण्यात आली.

ते पुढे म्हणाले, जागतिक तापमानवाढीची समस्या संपूर्ण जगाला भेडसावत आहे. परिणामी हिमशिखरे वितळून समुद्रकिनाऱ्यावरील शहरे पाण्याखाली जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. मी प्रशासकीय सेवेत दाखल झाल्यावर सर्वप्रथम हिवरेबाजार येथेच काम सुरू केले. आजपर्यंत ७ ते ८ वेळा हिवरेबाजारला भेट दिली असून येथे लोकसहभागातून करण्यात आलेली गुणवत्तापूर्ण विकासकामे इतर गावांसाठी आदर्श आहेत. विकासकामांतील सातत्य आणि पारदर्शकता यामुळे हिवरेबाजार हे ग्रामविकासातील पंढरी ठरले आहे. माझ्या २२ वर्षांच्या सेवेत हिवरेबाजारने खऱ्या अर्थाने दिशादर्शक भूमिका बजावली आहे.

भंडारी यांनी केंद्र सरकारच्या मिशन लाईफ या प्रकल्पाची सुरुवात हिवरेबाजारपासून व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यांनी नमूद केले की, निसर्गाच्या अति शोषणामुळे कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण वाढले आहे. यासाठी कार्बन क्रेडिट संकल्पना राबवावी, विजेचा कमीत कमी वापर करावा व अनावश्यक लाईट बंद ठेवाव्या.

भंडारी यांनी सांगितले की, राष्ट्रीय पातळीवरील धोरणात्मक बैठकीत मला पद्मश्री पोपटराव पवार यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली, त्यामुळे हिवरेबाजारचे प्रत्यक्ष प्रतिबिंब देशभरात पाहायला मिळते. निश्चितच, अहिल्यानगर जिल्ह्याच्या ग्रामविकासात हिवरेबाजारचे योगदान अमूल्य आहे.

कार्यक्रमात ग्रामस्थांच्यावतीने आनंद भंडारी यांचा फेटा बांधून व 'बुद्धायन' हे पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. तसेच गटशिक्षणाधिकारी बाबुराव जाधव यांची बदली झाल्याबद्दल आणि संजय पवार यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ, गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे, केंद्रप्रमुख अंबादास गारुडकर, सरपंच विमलताई ठाणगे, चेअरमन छबुराव ठाणगे, व्हा. चेअरमन रामभाऊ चत्तर, दूध संस्था चेअरमन बाबासाहेब गुंजाळ, हरिभाऊ ठाणगे (सर), एस.टी. पादीर (सर), रो. ना. पादीर, मुख्याध्यापक बाबासाहेब जाधव, मुख्याध्यापक मुरलीधर अमृते यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

